- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,४४,७०० /-
✔ २२ कॅरेट : १,३१,३५० /-
✔ चांदी : १,९९,३००/-

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर
संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 Mail Id : sinhvanivrutta@gmail.com दिनांक : शुक्रवार, ३० ऑक्टोबर २०२६ Epaper : epaper.sinhvani.com पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३२० | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रलंबित निवडणुकांना न्यायालयाचा हिरवा कंदील

राज्यातील २२ जिल्हा परिषद आणि उर्वरित पंचायत समित्यांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

ओबीसी आरक्षणासह स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका घेऊ शकता, असा महत्त्वपूर्ण आदेश स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांबद्दल सुप्रीम कोर्टाने दिला आहे. अंतरिम व्यवस्था म्हणून निवडणुका घेतल्या जाव्यात, ज्या निवडणुका अजून बाकी आहेत, त्याही घेतल्या जाऊ शकतात, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. त्या अंतिम निर्णयाच्या अधीन असतील, असेही कोर्टाने नमूद केले. त्यामुळे राज्यातील २० जिल्हा परिषदा आणि २११ पंचायत समित्यांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे.

सुप्रीम कोर्टाचे आदेश काय?

निवडणुका घेण्यासाठी आयोगाला पुरेसे मनुष्यबळ पुरवा असे राज्य सरकारला आम्ही आधीच सांगितलंय प्रलंबित निवडणुकांची अधिसूचना न काढण्याचं समर्थन होऊच शकत नाही. आयोग आणि राज्य सरकारनं निवडणुका घेण्यासाठी आवश्यक त्या गोष्टी कराव्या आणि तसं आम्हाला सांगावं. आम्ही टाकलेल्या अटी-शर्तीनुसार निवडणुका घेतल्या जाव्या.

वरिष्ठ वकील इंदिरा जयसिंग यांनी न्यायालयाचा निर्दशनास आणून देताना सांगितले की, न्यायालयाच्या आदेशानुसार, १२



जिल्हा परिषदांमध्ये निवडणुका पार पडल्या आहेत. आता २० जिल्हा परिषदा आणि २११ पंचायत समित्यांच्या निवडणुका बाकी आहेत. तुम्ही अंतिम सुनावणीसाठी प्रकरण पुढे ढकलत आहात, परंतु 'ओबीसींसाठी किती टक्के आरक्षण असावे' हा मुख्य प्रश्न अजूनही निकाली निघायचा आहे. मी केवळ इतकीच विनंती करत आहे की, राज्य निवडणूक आयोगामार्फत वापूर्वी राबवल्या गेलेल्या प्रक्रियेप्रमाणेच उर्वरित निवडणुकाही पूर्ण केल्या जाव्यात.

न्यायालयाच्या सध्याच्या आदेशांनुसार या निवडणुका सुरू राहू शकतात आणि त्यानंतर तुम्ही सुनावणीसाठी कोणतीही तारीख निश्चित करू शकता. ५० टक्क्यांच्या आरक्षणाचा मुद्दा या प्रकरणाच्या अंतिम निकालाच्या अधीन असेल.

लोकशाही प्रक्रिया का थांबवली जावी

यानंतर सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी लोकशाही प्रक्रिया का थांबवली जावी अशी विचारणा केली. सॉलिसिटर जनरल यांनी कोणाला तरी यावर आक्षेप असू शकतो, असे नमूद करताच सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले, आम्ही आधीच असा आदेश दिला आहे की, अंतरिम व्यवस्था म्हणून निवडणुका घेतल्या जाव्यात. ज्या निवडणुका अजून बाकी आहेत, त्याही घेतल्या जाऊ शकतात. मात्र, त्या अंतिम निर्णयाच्या अधीन असतील.

कोणत्या जि.प.निवडणुका प्रलंबित?

- कोकण
- नाशिक
- जळगाव
- बीड
- हिंगोली
- अकोला
- यवतमाळ
- भंडारा
- चंद्रपूर
- पालघर
- धुळे
- अहिल्यानगर
- जालना
- विदर्भ
- वाशिम
- नागपूर
- गोंदिया
- ठाणे
- नंदुरबार
- मराठवाडा
- नांदेड
- अमरावती
- बुलढाणा
- वर्धा
- गडचिरोली

थोडक्यात

बंद फ्लॅटमध्ये आढळले तीन मृतदेह

मुंबई : विरार (पश्चिम) येथील ग्लोबल सिटी परिसरात एका भाड्याच्या फ्लॅटमध्ये तीन अविवाहित बहीण-भावांचे मृतदेह आढळले आहेत. त्यांनी विष प्राशन करून जीवन संपवले असावे, असा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. तत्पूर्वी त्यांनी गुजराती भाषेत एक व्हिडिओ रेकॉर्ड केला असून, त्यात आपल्या आजारपणाची व हलाखीच्या परिस्थितीची व्यथा मांडल्याचे तपासात समोर आले आहे. कुमार मेहता (५०), दिपेश मेहता (५२) आणि खेवना मेहता (४८) अशी मृत बहीण-भावांची नावे आहेत. हे तिघेही विरार (पश्चिम) येथील ग्लोबल सिटी परिसरातील गार्डन एव्हेन्यू इमारतीच्या डी विंगमधील फ्लॅट क्रमांक १२०३ मध्ये राहत होते. गुरुवारी या बंद फ्लॅटमधून प्रचंड दुर्गंधी येत असल्याचे लक्षात आल्यावर स्थानिक रहिवाशांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिली.

घटनेची माहिती मिळताच बोळिंज पोलिसांनी गुरुवारी पहाटे २.३० च्या सुमारास घटनास्थळी धाव घेतली. फ्लॅटचा दरवाजा तोडून आत प्रवेश केला असता, तिघांचे मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळून आले. बोळिंज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश कावळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या तिघांचा मृत्यू साधारण ३ ते ४ दिवसांपूर्वी झाला असावा. पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवले आहेत. पोलिस तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, हे कुटुंब २०२५ पासून या घरात भाड्याने राहत होते. तीन भावंडांपैकी एकजण अर्धांगवायूने ग्रस्त होता, तर दुसरा भाऊ कर्करोगावर उपचार घेत होता. आजारपणाच्या वाढत्या खर्चामुळे आणि उत्पन्नाचे साधन नसल्याने त्यांच्यावर गंभीर आर्थिक संकट कोसळले होते.

सुधाकर कोहळेंना दुसरा क्रमांक, अपघात की घातपात?

अवैध मतदानाचा आकडा नागपुरात पुन्हा ऐरणीवर

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत सलग दुसऱ्यांदा भाजपचा पराभव झाला आहे. काँग्रेस उमेदवार आणि विद्यमान आमदार अभिजीत वंजारी यांनी सुधाकर कोहळे यांचा ३२७१ मतांनी पराभव केला असला, तरी कोहळे यांना अवैध ठरल्यामुळे मिळू न शकलेल्या सुमारे सात हजार मतांमागे भाजप आणि कोहळे यांचा "करेक्ट कार्यक्रम" करण्याचे काही नियोजन होते का? निवडणूक आयोगाकडून या निवडणुकीत नोटाचा पर्याय नसताना मतदारांनी स्वतःहून २ अंकाचा वापर करून आपला मतदान एका प्रकारे नोटा करून घेतला का? अशी चर्चा सुरू झाली आहे.

नागपूर विभाग पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीत भाजप उमेदवार सुधाकर कोहळे यांच्या नावासमोर १ ऐवजी २ हे अंक



लिहून सुमारे सहा ते सात हजार मतदारांनी मतदान केल्यामुळे कोहळे यांना मिळू शकणारा हजारो मतदान अवैध ठरला आहे. कोहळे यांच्या नावासमोरील डब्यात १ अंकाऐवजी २ दिल्यामुळे या सर्व मतपत्रिका अवैध श्रेणीत गेल्या आणि त्यामुळे अवैध मतांचा आकडा ही १५१०६ पर्यंत वाढला. जर कोणाच्या नावासमोर २ अंक लिहून मत अवैध करणारे मतदारांनी १ लिहिले असते तर सुधाकर कोहळे यांना हजारो मत जास्त मिळू शकले असते. एवढ्या मोठ्या संख्येने मतदारांनी एकसारखी चूक कशी आणि का केली? का ठरवून केलेला "करेक्ट कार्यक्रम" आहे का? हा नेमका अपघात आहे की कोणी ठरवून घात केला आहे? अशीही चर्चा सध्या सुरू आहे.

यंदा मात्र सुधाकर कोहळे यांना हजारो मतदारांनी एक क्रमांकाचा मत न देता दोन क्रमांकाचा मत देऊन आपले मत अवैध करून घेतले हा अपघात नसून घातपात आहे. नितेश कराळे यांनाही नागपूरच्या अनेक भाजप अनुकूल वस्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर पहिल्या आणि दुसऱ्या पसंतीचे मत मिळाले आहे.

नितेश कराळेकडे कुठलीही यंत्रणा नसताना त्या तरुणाने एवढं मतदान कसं आणि कोणाचा मिळवला हा मुद्दा विचार करण्यासारखा आहे. त्यामुळे झालेल्या या निवडणुकीनंतर आता मतदान आकडेवारींचा जननेसोबतच पक्षस्तरावरही चर्चा सुरू आहे.

युती टिकवायची की तोडायची भाजपने ठरवावे : अब्दुल सत्तार

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाचा निकाल लागल्यावर आता महायुतीतच वादाचा धुरळा उडाल्याचं दिसतंय. शिवसेना आणि भाजप नेते एकमेकांवर खुलेआम आगपाखड करत आहेत. मात्र गेल्या काही दिवसांपासून एकनाथ शिंदेना मुख्यमंत्रिपदावर विराजमान करण्याच्या शिवसेना नेत्यांच्या मागणीनं या वादात पुन्हा उचल खाल्ल्याचं दिसतंय. शिवसेना नेते अब्दुल सत्तार आणि रवींद्र धंगेकर यांनी थेट मुख्यमंत्रिपदावर वक्तव्य केलं आहे. तसेच महायुती टिकवायची की नाही हे आता भाजपच्या हातात असल्याचं अब्दुल सत्तार म्हणाले.

२०२४ च्या विधानसभा निवडणुका महायुती एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात लढल्यानं मुख्यमंत्रिपदावर शिंदेंचाच अधिकार असल्याचं अब्दुल सत्तारांनी म्हटलं आहे. तर शिंदेंच्या काळात सरकार आणि जनतेतला समन्वय चांगला



होता. त्यामुळे शिंदेंच पुन्हा मुख्यमंत्रिपदावर विराजमान व्हावेत, असं धंगेकरांनी म्हटलं आहे. त्यामुळे निवडणूक निकालानंतर निर्माण झालेल्या वादाचा मुख्य उद्देश हा मुख्यमंत्रिपदाबाबत असल्याचं लपून राहिलेलं नाही.

काय म्हणाले अब्दुल सत्तार?

छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी राष्ट्रवादीच्या सतीश चव्हाण यांना आम्ही पाठिंबा देणार नाही असं जाहीर केलं. आमच्या नेत्यांनी तसं जाहीर केल्यानंतर आम्हीदेखील सतीश चव्हाण यांना विरोध केला. मी लपून-छपून काही केलं नाही, जे काही केलं ते खुलं केलं.

महायुतीमध्ये कोणताही मिठाचा खडा पडला नाही. तसं काही असेल तर मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री हे एकत्र बसतील आणि चर्चा करून मार्ग काढतील. त्यांनी आम्हाला काही प्रश्न विचारले तर आम्ही त्याचे उत्तर देऊ. आजकाल देशामध्ये जी परिस्थिती निर्माण झाली आहे त्यामध्ये अब्दुल सत्तार नावाला विरोध केला जात आहे. त्यामुळे आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना अनेक संकटातून वाट निर्माण करावी लागते, असंही अब्दुल सत्तार म्हणाले.

एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात निवडणुका झाल्या, आता त्यांनीच मुख्यमंत्री व्हावे

एकनाथ शिंदे दिल्लीला जातात आणि पंतप्रधान मोदी, अमित शाहांना भेटतात. त्यावेळी शिंदे पुन्हा मुख्यमंत्री होणार का अशी चर्चा सुरू होते. यावेळी आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना त्याचा आनंद वाटतो. त्यामुळे भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांमध्ये मात्र काहीशी नाराजी निर्माण होते. देशात जशी भाजपची सत्ता आहे तशी महाराष्ट्रातही आहे. १३२ आमदार त्यांच्या पक्षाचे आहेत, मात्र बहुमतासाठी १४५ आमदार लागतात. त्यामुळे आता महायुती टिकवायची की नाही हे सर्व भाजपच्या हातात आहे.

एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांच्याच नेतृत्वाखाली विधानसभेच्या निवडणुका महायुतीने जिंकल्या. त्यामुळे तेच मुख्यमंत्री व्हावेत ही शिवसेनेची भावना आहे, असे अब्दुल सत्तार म्हणाले.

सेवानिवृत्त प्राध्यापक चंद्रशेखर दहीकर हत्या प्रकरणातील आरोपी अजय ब्राह्मणकरला ५ दिवसाची पोलीस कोठडी

बोथली येथील फार्महाऊसमध्ये आढळला होता ६२ वर्षीय प्राध्यापकांचा मृतदेह, संशयास्पद मृत्यूच्या तपासातून हत्येचे प्रकरण उघड



दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव

गोंदिया जिल्ह्यातील आमगाव तालुक्यातील बोथली येथे सेवानिवृत्त प्राध्यापक चंद्रशेखर भास्कर दहीकर यांच्या मृत्यूप्रकरणाला आता महत्त्वाचे वळण मिळाले आहे. या प्रकरणातील आरोपी अजय ब्राह्मणकर यांना न्यायालयात हजर केली असता न्यायालयाने पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

चंद्रशेखर भास्कर दहीकर (वय ६२) हे सेवानिवृत्त प्राध्यापक होते. बोथली येथील त्यांच्या फार्महाऊस परिसरात त्यांचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली होती. मृत्यूचे नेमके कारण आणि परिस्थिती संशयास्पद वाटत असल्याने या घटनेबाबत विविध प्रश्न उपस्थित झाले होते. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून तपास सुरू केला. या प्रकरणाच्या तपासादरम्यान अजय ब्राह्मणकर यांचे नाव आरोपी म्हणून समोर आले. त्यानंतर त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली. या प्रकरणात मृत्यूमागील नेमके कारण, घटनेची पार्श्वभूमी आणि संबंधित व्यक्तींची भूमिका यांचा उलगडा करण्यासाठी पोलिसांकडून तपास केला जात आहे.

हत्येमागील कारणाचा शोध सुरू

या घटनेमागील नेमके कारण काय, मृत्यूच्या वेळी नेमकी कोणती परिस्थिती निर्माण झाली होती आणि या प्रकरणात अन्य कोणाचा सहभाग आहे का, या प्रश्नांची उत्तरे तपासातून समोर येणे अपेक्षित आहे. पोलिसांकडून उपलब्ध पुरावे आणि इतर बाबींच्या आधारे पुढील तपास केला जात आहे.

दरम्यान, आरोपीला पोलीस कोठडी सुनावण्यात आली असली तरी न्यायालयात दोष सिद्ध होईपर्यंत आरोपीला दोषी ठरवता येत नाही. तपासातून अधिकृतरीत्या समोर येणाऱ्या निष्कर्षांकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

पुढील तपास पोलीस अधीक्षक गोरख भामरे, अप्पर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे,, उपविभागीय पोलीस अधिकारी नंदनी चानपुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक निळकंठ कुकडे करीत आहेत.

दिशा सालियन प्रकरणात आदित्य ठाकरेंना अटक करा : नरेश म्हस्के

सीबीआयकडे मागणी करणार, अमित शाहांना भेटणार

वृत्तसंस्था, ठाणे

ठाकरेंच्या शिवसेनेचे ठाण्यातील विभागप्रमुख प्रदीप पूर्णेकर यांच्या हत्या प्रकरणावरून दोन्ही शिवसेनेमध्ये आरोप-प्रत्यारोप होत आहेत. प्रदीप पूर्णेकर प्रकरणात एकनाथ शिंदे हे कोणाला वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत असा प्रश्न आदित्य ठाकरे यांनी विचारला. त्यावर आता शिवसेनेचे खासदार नरेश म्हस्के यांनी प्रत्युत्तर दिले आहे. आदित्य ठाकरे यांचे नाव दिशा सालियन प्रकरणात आरोपी म्हणून आहे. त्यांना अटक करा अशी मागणी आपण सीबीआयकडे करणार असल्याचं ते म्हणाले. तसेच या प्रकरणात कारवाई व्हावी यासाठी केंद्रीय गृहमंत्र्यांना भेटणार असल्याचंही म्हस्के म्हणाले.

प्रदीप पूर्णेकर प्रकरणात शिंदेंच्या शिवसेनेच्या नगरसेविका मीनाक्षी शिंदे यांना अटक करा, अशी मागणी आदित्य ठाकरे यांनी केली. तसेच एकनाथ शिंदे हे मीनाक्षी शिंदेंना का वाचवत आहेत? असा सवालही त्यांनी केला.

आदित्य ठाकरे यांच्या आरोपांना प्रत्युत्तर देताना खासदार नरेश म्हस्के म्हणाले की, "एकनाथ शिंदे यांच्यावर आरोप करण्याचा कोणताही अधिकार आदित्य ठाकरे यांना नाही. आदित्य ठाकरे यांचे नाव दिशा सालियन प्रकरणात आरोपी म्हणून आहे. दिशा सालियन यांच्या वडिलांनी तसे आरोप केले आहेत. सुशांत सिंह राजपूत प्रकरणातही त्यांचे नाव आहे. ठाण्यात ऑटोमोबाईलचे दुकान असलेल्या मनसुख हिरेन प्रकरणाशी त्यांचा संबंध आहे. असं असताना शिंदेंचे नाव त्यांनी घेऊ नये."

आदित्य ठाकरे यांना सीबीआयने अटक करावी यासाठी शिवसेना मुंबईत मोर्चा काढणार असल्याचं नरेश म्हस्के म्हणाले. आदित्य ठाकरे यांना अटक करावी यासाठी आम्ही केंद्रीय गृहमंत्र्यांची भेट घेऊ, असंही म्हस्के म्हणाले.

संपादकीय लेखणीतून...

अटींची आडकाठी!

राज्यातील दुष्काळग्रस्त ३०४ तालुक्यांतील सुमारे दीड कोटी शेतकऱ्यांना अंतरिम मदत म्हणून प्रत्येकी ५ हजार रुपये देण्याचा निर्णय मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला; मात्र या मदतीसाठी सरकारने ३३ टक्क्यांहून अधिक नुकसानीची अट ठेवली आहे त्यामुळे अनेक शेतकरी मदतीपासून वंचित राहण्याची शक्यता आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार येत्या २ दिवसात शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये पैसे जमा करण्याची प्रक्रिया सुरू होईल. दिवाळीपूर्वी सर्व पात्र शेतकऱ्यांना मदतीची रक्कम पोहोचवली जाईल. वासाठी लागणाऱ्या ७ हजार ५०० कोटी रुपयांच्या निधीला मान्यता देण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर या निर्णयाची माहिती दिली. राज्य सरकारने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना ५ हजार रुपयांची मदत जाहीर करताना कर्जमुक्तीचे निकष लावले आहेत. मदत व पुनर्वसन विभागाने मंगळवारी या संदर्भातील शासन निर्णय जारी केला.

त्यानुसार राज्यातील विद्यमान तसेच माजी मंत्री, राज्यमंत्री, विद्यमान आणि माजी लोकसभा, राज्यसभा सदस्य, जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य, महापालिका, नगरपालिका, नगर पंचायतीचे सदस्य यांना मदतीचा लाभ मिळणार नाही. महिना २५ हजारांपेक्षा जास्त वेतन घेणारे केंद्र व राज्य सरकारचे सर्व अधिकारी, कर्मचारी, एमआयडीसी, महावितरण, एस. टी. महामंडळ अशा राज्य सार्वजनिक क्षेत्रातील, उपक्रमातील कर्मचारी, राज्यातील सर्व अनुदानित संस्थांचे अधिकारी-कर्मचारी, शेतीचा उत्पन्नाच्या स्रोतांतून आयकर भरणारे शेतकरी मदतीसाठी अपात्र राहतील. मासिक निवृत्ती वेतन २५ हजारांपेक्षा जास्त असणारे (माजी सैनिक वगळून) निवृत्ती वेतनधारक मदतीसाठी अपात्र राहतील. दुष्काळी तालुक्यातील ज्या शेतकऱ्यांच्या पिकांचे ३३ टक्क्यांहून अधिक नुकसान झाले आहे, अशा सर्व शेतकऱ्यांना सरसकट ५ हजार रुपये अग्रिम देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या सर्व पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात डीबीटी प्रणालीद्वारे मदत जमा करण्यात येईल. ज्या शेतकऱ्यांनी १ नोव्हेंबर २०२५ ते आतापर्यंत विविध शासकीय योजनांतर्गत ई-केवायसी केली आहे त्यांची पुन्हा ई-केवायसी केली जाणार नाही. ज्या वनपट्टाधारक शेतकऱ्यांना अजूनही ॲग्रीस्टॅक शेतकरी ओळख क्रमांक मिळालेला नाही त्यांना ई-केवायसी आधारेच अग्रिम दिली जाईल.

शेतीचा वाढता उत्पादन खर्च, दुष्काळाची झळ, शेतमालाला योग्य हमीभाव न मिळणे आणि कर्जफेडीचे ओझे अशा विविध समस्यांमुळे शेतकऱ्यावरील आर्थिक संकट दिवसेंदिवस गंभीर होत आहे. महाराष्ट्रात जानेवारी २०२२ ते जून २०२६ या ४ वर्षात १३ हजार ९२८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. यामुळे शेतकऱ्यांना संकटात ढकलणाऱ्या समस्यांवर दीर्घकालीन उपाययोजना करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात शेती केली जात असली तरी त्यातून मिळणारे उत्पन्न बऱ्याच वेळा अनिश्चित असते. पेरणीसाठी बियाणे, खते आणि कीटकनाशकांवर खर्च करावा लागतो त्यानंतर पाऊस, पीक आणि बाजारभाव यांचा मेळ बसत नाही. अतिवृष्टी, अवकाळी पाऊस अथवा दुष्काळामुळे पीक हातचे गेल्यास शेतकऱ्याला मोठा आर्थिक फटका बसतो. उत्पादन घटले, बाजारभाव कोसळले तरी शेतीसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्याची जबाबदारी कायम राहते अशा परिस्थितीमुळे शेतकऱ्याचे आर्थिक गणित कोलमडते.

या समस्यांच्या विळख्यात सापडलेल्या हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. दुष्काळाच्या संकटाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांचा मागे कर्ज वसुलीचा तगादा लावून त्यांना आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या मायक्रो फायनान्स आणि खासगी वित्त कंपन्यांच्या विरोधात थेट गुन्हे दाखल करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत त्यामुळे मुजोर फायनान्स कंपन्यांच्या दादागिरीला आळा बसू शकेल. अशा प्रकारामुळे नादेडमध्ये एका शेतकऱ्याने आत्महत्या केली. या पार्श्वभूमीवर सर्व पोलिस अधीक्षकांना शेतकऱ्यांच्या तक्रारी तातडीने नोंदवून संबंधितांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कर्ज वसुलीसाठी दमदाटी किंवा बळाचा वापर करणाऱ्या मायक्रो फायनान्स कंपन्यांचा वरिष्ठ अधिकाऱ्यांवरही कारवाई केली जाईल. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ठेवण्यात आलेली नुकसानीची अट जाचक ठरणार यात शंका नाही.

राजकीय स्वार्थासाठी राजीनामे, किंमत मात्र जनतेच्या माथी!

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

राजकीय स्वार्थासाठी वारंवार दिले जाणारे राजीनामे आणि त्यामुळे जनतेवर लादल्या जाणाऱ्या पोटनिवडणुका हा लोकशाहीतील अत्यंत गंभीर आणि चिंतेचा विषय आहे. या राजकीय साठमारीची खरी किंमत शेवटी प्रामाणिक करदात्याला आणि सामान्य जनतेलाच मोजावी लागते.

भारतातील संसदीय शासनप्रणालीमध्ये निवडणुका हा केवळ सत्तेवर पोहोचण्याचा तांत्रिक मार्ग नसून तो देशातील कोट्यवधी जनतेने आपल्या लोकप्रतिनिधींवर दाखवलेल्या अतूट विश्वासाचा पवित्र सामाजिक आणि घटनात्मक करार असतो. देशाचा कारभार जनकल्याणाच्या दिशेने चालावा, आपल्या मतदारसंघातील मूलभूत समस्या सोडवल्या जाव्यात आणि संविधानाच्या चौकटीत राहून लोकहिताचे निर्णय घेतले जावेत, या उदात्त हेतूने सामान्य नागरिक मतदान केंद्रावर जाऊन मत नोंदवतो. मात्र, अलीकडच्या काही दशकांत निवडणूक कायदे आणि त्यातील पळवाटांचा अत्यंत सोयीस्कर अन्वयार्थ लावून राजकीय महत्त्वाकांक्षा साधण्याची नवी, धोकादायक आणि अनैतिक प्रथा प्रस्थापित होऊ पाहत आहे. निवडणुकीच्या काळात एका पक्षाची विचारसरणी, त्याचा निवडणूक जाहीरनामा आणि त्याचे अधिकृत चिन्ह घेऊन मतदारांपुढे हात जोडून मते मागायची, विजय संपादन करायचा आणि त्यानंतर राज्यातील राजकीय वारे बदलताच अथवा सत्तेची नवी गणिते दिसताच अवघ्या काही महिन्यांत लोकप्रतिनिधीपदाचा राजीनामा फेकून द्यायचा, हा सत्तेचा खेळ आता नित्याचा बनला आहे.

अशा प्रकारच्या सोयीस्कर आणि पूर्वनियोजित राजीनाम्यांचे थेट दुष्परिणाम संबंधित मतदारसंघातील सर्वसामान्य नागरिकांना भोगावे लागतात. शेतकरी, कामगार, महिला, तरुण आणि ज्येष्ठ नागरिक उन्हाताऱ्हात तासन्तास रांगेत उभे राहून आपला अमूल्य वेळ खर्च करतात आणि पाच वर्षांच्या स्थिर कार्यकाळासाठी एका उमेदवाराला जनादेश देतात. मात्र, जेव्हा तो निवडून आलेला प्रतिनिधी क्षुल्लक राजकीय लाभासाठी किंवा पक्षांतराच्या क्लृप्तीसाठी एका क्षणात पदाचा त्याग करतो, तेव्हा तो केवळ एका पदाचा राजीनामा नसतो, तर तो त्या लाखो मतदारांच्या सामूहिक विश्वासाशी केलेला द्रोह असतो. 'तुम्ही कोणालाही निवडून द्या, आम्ही शेवटी आम्हाला हव्या त्या पक्षात जाऊन सत्तेची खुर्ची मिळवणारच' असा एक प्रकारचा बेमुर्वत आणि उद्दाम संदेश यातून समाजात पसरतो. यामुळे लोकशाही शासनव्यवस्थेवरील सामान्य माणसाचा विश्वास डळमळीत होतो आणि मतदानाच्या अधिकाराचे अवमूल्यन होऊन मतदारांमध्ये प्रचंड उदासीनता निर्माण होते.

या संपूर्ण प्रकरणाची सर्वांत चिंताजनक आणि गंभीर बाजू म्हणजे सरकारी तिजोरीवर पर्यायाने देशातील सर्वसामान्य करदात्यांवर पडला जाणारा प्रचंड आर्थिक बोजा होय. कोणतीही विधानसभा सार्वत्रिक निवडणूक असो वा अचानक लादली गेलेली पोटनिवडणूक, ती शांततेत आणि सुरळीत पार पाडणे हे प्रशासनासाठी महाकठीण आणि प्रचंड खर्चिक काम असते. मतदान केंद्रांची उभारणी, हजारो इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची सुरक्षित वाहतूक व तपासणी, मतदान केंद्रांवर काम करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांचे व शिक्षकांचे भत्ते, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी राज्य पोलीस दल तसेच केंद्रीय राखीव पोलीस दलांच्या तुकड्यांची तैनाती, त्यांच्या प्रवासाचा, राहण्याचा व भोजनाचा खर्च या सर्वांवर प्रत्येक मतदारसंघात कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी होते.

सर्वसामान्य नागरिकाने जीवनावश्यक वस्तूंवर भरलेला वस्तू व सेवा कर, मध्यमवर्गीयांनी भरलेला प्राप्तिकर आणि कष्टकऱ्यांच्या घामातून जमा झालेला महसूल हा गावागावांतील रस्ते, दर्जेदार सरकारी रुग्णालये, शाळा, पाणीपुरवठा आणि रोजगारच्या संधी निर्माण करण्यासाठी वापरला जाणे अपेक्षित असते. परंतु, केवळ नेत्यांच्या व्यक्तिगत पुनर्वसासाठी आणि सत्ताधारी गटात सामील होण्याच्या हव्यासापोटी हा जनतेचा घाम आणि पैसा वारंवार पोटनिवडणुकांच्या आगीत होरपळला जातो. नेत्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षांचे हे महागडे बिल सर्वसामान्य करदात्यांनी का भरावे, हा प्रश्न आता प्रत्येक नागरिकाच्या मनात तीव्रतेने उपस्थित होत आहे.

नेत्यांच्या या मनमानी कारभाराला आणि सार्वजनिक पैशांच्या अपव्ययाला आता देशाच्या सर्वोच्च न्यायव्यवस्थेच्या पटलावर थेट आव्हान देण्यात आले आहे. २७ ऑक्टोबर २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या तीन सदस्यीय विशेष खंडपीठासमोर या संदर्भातील अत्यंत महत्त्वपूर्ण याचिकेवर प्राथमिक सुनावणी पार पडली. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहन यांच्या खंडपीठाने या याचिकेतील मुद्द्यांचे गांभीर्य ओळखून केंद्र सरकार, भारतीय निवडणूक आयोग, तामिळनाडूचे मुख्य निवडणूक अधिकारी आणि संबंधित माजी लोकप्रतिनिधींना अधिकृत नोटीस जारी केली आहे.

या याचिकेच्या केंद्रस्थानी तामिळनाडू विधानसभा निवडणुकीनंतर घडलेला एक मोठा राजकीय पेच आहे. तेथे निवडणुका पार पडल्यानंतर अवघ्या काही काळातच एआयएडीएमके पक्षाच्या ६ निवडून आलेल्या आमदारांनी कोणत्याही ठोस कारणाशिवाय आपापल्या विधानसभा सदस्यत्वाचे राजीनामे दिले. एस. जयकुमार, मरगाथम कुमारवेल, पी. सत्यबामा, डॉ. एसाक्की सुब्बैया, सी. विजयभास्कर आणि एम. आर. विजयभास्कर या ६ आमदारांनी राजीनामा दिल्यामुळे त्या सर्व मतदारसंघांत पुन्हा नव्याने पोटनिवडणुका घेण्याची वेळ प्रशासनावर आली. कोणतीही अपरिहार्य, कौटुंबिक, आरोग्यविषयक किंवा घटनात्मक आणीबाणी नसताना केवळ राजकीय पुनर्रचनेसाठी जनतेवर ही निवडणूक लादण्यात आली, असा थेट आरोप याचिकेत करण्यात आला आहे.

संविधानाने प्रत्येक नागरिकाप्रमाणेच लोकप्रतिनिधीलाही राजीनामा देण्याचे वैयक्तिक स्वातंत्र्य दिले आहे, यात दुमत नाही. जर एखाद्या लोकप्रतिनिधीला गंभीर आजारपण असेल, कौटुंबिक अडचण असेल किंवा पक्षाच्या धोरणांवर अत्यंत टोकाचे तात्त्विक मतभेद असतील, तर त्यांनी नैतिक भूमिकेतून दिलेला राजीनामा समजण्यासारखा असतो. परंतु, जेव्हा पक्षांतर बंदी कायद्यातील कारवाई टाळण्यासाठी, अपात्रतेच्या कारवाईपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी अथवा दुसऱ्या पक्षात जाऊन लगेच मंत्रिपदाची किंवा सत्तेची फळे चाखण्यासाठी राजीनाम्याचा वापर एक 'सुरक्षित राजकीय शस्त्र' म्हणून केला जातो, तेव्हा तो संविधानाच्या मूळ आत्म्यालाच सुरुंग लावण्यासारखा ठरतो. लोकशाहीत राजकीय स्वातंत्र्याचा अधिकार हा इतरांच्या विशेषतः जनतेच्या हक्कांवर गदा आणण्यासाठी किंवा सरकारी पैशांचा चुराडा करण्यासाठी वापरला जाऊ शकत नाही.

याच पार्श्वभूमीवर, सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या या याचिकेने देशातील संपूर्ण राजकीय व्यवस्थेला आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडणारा एक धाडसी पर्याय पुढे ठेवला आहे. जर एखाद्या लोकप्रतिनिधीने केवळ स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण न करता स्वेच्छेने राजीनामा दिला आणि त्यामुळे पोटनिवडणूक घेणे क्रमप्राप्त ठरले, तर त्या पोटनिवडणुकीचा संपूर्ण प्रशासकीय आणि आर्थिक खर्च संबंधित माजी लोकप्रतिनिधीकडून अथवा त्याला आश्रय देणाऱ्या राजकीय पक्षाकडून पूर्णपणे का वसूल केला जाऊ नये? जोपर्यंत अशा स्वार्थी राजकीय खेळींवर आर्थिक, प्रशासकीय आणि कायदेशीर उत्तरदायित्व निश्चित केले जात नाही, तोपर्यंत जनमताचा हा अनादर आणि करदात्यांच्या पैशांची लूट थांबणार नाही.

जर राजीनामा दिल्यानंतर कोट्यवधी रुपयांचा निवडणूक खर्च स्वतःच्या खिशातून भरावा लागेल किंवा निवडणुकीवर काही वर्षांची बंदी येईल अशी कठोर तरतूद झाली, तर राजकीय सोयीनुसार निष्ठा बदलणाऱ्या नेत्यांना आणि त्यांना फूस लावणाऱ्या पक्षांना मोठा लगाम बसेल. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेला हा खटला केवळ एका राज्यापुरता किंवा सहा आमदारांपुरता मर्यादित नसून, तो भविष्यातील भारतीय निवडणूक सुधारणांची, लोकशाहीच्या मूल्यांची आणि करदात्यांच्या अधिकारांची दिशा ठरवणारा एक ऐतिहासिक टप्पा ठरेल यात शंका नाही.

- ९५६१५९४३०६

काळजी आणि समर्थन : समाज समृद्धीचे मुख्य घटक

कृष्णकुमार निकोडे
गडचिरोली

आंतरराष्ट्रीय काळजी आणि समर्थन दिन समाजातील अशा घटकांचा समर्थनासाठी साजरा केला जातो ज्यांना विशेष काळजी, मदत, आणि सहकार्याची आवश्यकता असते. यामध्ये वृद्ध, दिव्यांग, आजारी व्यक्ती, आणि समाजातील दुर्बल घटकांचा समावेश होतो. या दिवसाचे उद्दिष्ट म्हणजे या लोकांना सामाजिक, आर्थिक, आणि मानसिक आधार देणे आणि त्यांच्याबद्दल सहानुभूती, आदर, आणि समर्पण निर्माण करणे आहे.

काळजी आणि समर्थन हे समाजाच्या समृद्धीचे मुख्य घटक आहेत. या दिवशी विविध सामाजिक संघटना, स्वयंसेवक, आणि शासकीय यंत्रणा एकत्र येऊन विविध उपक्रम राबवतात ज्यामध्ये आरोग्य तपासणी, आर्थिक मदत, आणि शैक्षणिक संधींचा समावेश होतो. समाजातील प्रत्येक व्यक्तीने इतरांच्या काळजीत सहभागी होण्याची आणि त्यांना मानसिक व भावनिक आधार देण्याची जबाबदारी घेतली पाहिजे. आंतरराष्ट्रीय काळजी आणि समर्थन दिनाचा मुख्य उद्देश एक सशक्त आणि समजूतदार समाज निर्माण करणे आहे, ज्यामुळे प्रत्येकजण एकमेकांच्या आधाराने एकत्र राहून प्रगती करू शकेल.

जागतिक काळजी दिनाचा इतिहास : जागतिक काळजी दिनाची सुरवात दि.७ जून १९९७ रोजी ब्रिघिड नावाच्या बाळाच्या नऊ दिवसांच्या आयुष्यापासून सुरू झाली. अकाली जन्म झाल्यानंतर सॉफ्टवेअर अभियंता सोना मेहरिंग यांनी पहिली केअरिंगब्रिज वेबसाइट तयार केली. सोनामुळे मित्र आणि कुटुंबियांना बाळ ब्रिघिडच्या आरोग्याबद्दल ऑनलाइन अपडेट्स मिळू शकले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे वेबसाइटने ब्रिघिड आणि तिच्या कुटुंबाला आवश्यक गोष्टी आणि आराम दिला. त्यावेळी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म अस्तित्वात नसल्याने वेबसाइट तयार करण्याची कल्पना क्रांतिकारी होती. तसेच या दिवसाचा मुख्य उद्देश म्हणजे काळजी घेणे आणि करुणा बाळगणे किती महत्त्वाचे आहे? याची आठवण करून देणे होय. हा असा दिवस आहे, जेव्हा लोक एकमेकांबद्दल अधिक संवेदनशील आणि आधार देऊ शकतात. तसेच जागतिक काळजी दिन साजरा करण्याचे अनेक मार्ग आहे. जसे की, इतरांची काळजी घेणे. आपण आपल्यासोबत इतरांची काळजी घेणे देखील तेवढेच महत्वाचे असते. तसेच आपण स्वतःसोबत कुटुंबाची, मित्रांची आणि नातेवाईकांची-शेजाऱ्यांची, प्राण्यांची, पक्ष्यांची देखील काळजी घ्यावी. वामधून आत्मिक समाधान नक्कीच मिळते. तसेच एखाद्यासाठी वेळ काढा, त्यांना मदत करा किंवा त्यांच्याशी बोला. निसर्गबद्दल सहानुभूती दाखवा. तसेच इतरांशी दयाळू आणि आधार देणारे व्हा. इतरांच्या भावना समजून घ्या आणि त्यांना पाठिंबा द्या. तसेच प्रत्येकाने आपली शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्याची काळजी घ्या. निरोगी जीवनशैली पाळावी, पुरेशी झोप घेऊन नियमितपणे व्यायाम करावा.

जागतिक काळजी दिन हा असा दिवस आहे जेव्हा आपण एकमेकांबद्दल अधिक काळजी आणि करुणा दाखवू शकतो, जेव्हा आपण आपल्या सभोवतालच्या लोकांना आधार देऊ शकतो आणि त्यांना बरे वाटू शकतो. तसेच जागतिक काळजी दिनाचे महत्त्व इतरांना पटवून द्यावे. या दिवसाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी आपण सोशल मीडिया आणि इतर माध्यमांचा वापर देखील करू शकता.

१०० हून अधिक देशांनी सह-प्रायोजित केलेल्या एका ठरावानंतर, सन २०२३ मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेने "आंतरराष्ट्रीय काळजी आणि आधार दिन" घोषित केला.

- ९६९९८३६७१७

टी-२० पाठोपाठ वनडे मालिकेतही भारतीय महिलांचा झिम्बाब्वेला व्हाइटवॉश!

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

वैष्णवी शर्माची पंजा मिळवणारी गोलंदाजी; प्रतिका रावल-शेफाली वर्माच्या अर्धशतकांनी विजयावर शिक्कामोर्तब

टी-२० मालिकेनंतर एकदिवसीय मालिकेतही झिम्बाब्वेच्या महिला संघाला एकही विजय मिळवू न देता भारतीय महिलांनी आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले. तिसऱ्या आणि अंतिम एकदिवसीय सामन्यात भारताने झिम्बाब्वेचा आठ गडी राखून पराभव केला आणि तीन सामन्यांची मालिका ३-० अशी जिंकली. विशेष म्हणजे, टी-२० मालिकेतही भारताने याच फरकाने बाजी मारली. दोन भिन्न प्रकारच्या क्रिकेटमध्ये मिळवलेले हे सलग यश भारतीय संघाची सांघिक ताकद आणि वाढती गुणवत्ता अधोरेखित करणारे आहे.

निर्णायक सामन्यात वैष्णवी शर्माच्या भेदक गोलंदाजीने झिम्बाब्वेचा डाव १३१ धावांत गुंडाळला, तर प्रतिका रावल आणि शेफाली वर्मा यांच्या आक्रमक फलंदाजीने भारताला अवघ्या १७ षटकांत विजय मिळवून दिला. गोलंदाजीतील शिस्त आणि फलंदाजीतील आक्रमकता यांचा सुरेख संगम हे भारतीय विजयाचे वैशिष्ट्य ठरले.

वैष्णवीचा पंजा; झिम्बाब्वेची फलंदाजी निष्प्रभ

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारणाऱ्या झिम्बाब्वेची सुरुवातच खराब झाली. सायली सतघरे आणि क्रांती गौड यांनी सुरुवातीचे प्रत्येकी एक बळी मिळवत प्रतिस्पध्यांर्ला दबावाखाली आणले. तिसऱ्या षटकापर्यंत झिम्बाब्वेची अवस्था दोन बाद १२ अशी झाली होती. त्यानंतर वैष्णवी शर्मने फिरकीची जादू दाखवली. तिने बिलोव्हेड बिझा, मॉडेस्टर मुपाचिकवा, चिपट्झा धुरुु, मिशेल मावुंगा आणि न्याशा ग्वांजुरा यांना बाद करत एकदिवसीय क्रिकेटमधील पहिले पाच बळी मिळवण्याचा पराक्रम केला. मॉडेस्टर मुपाचिकवाने ४८ चेंडूंत सात चौकारांसह ३७ धावा करून प्रतिकार केला; मात्र वैष्णवीने तिला यष्टीचीत करत झिम्बाब्वेच्या डावाला निर्णायक धक्का दिला.

जोसेफिन न्कोमो आणि चिपट्झा धुरुु यांनी पाचव्या गड्यासाठी ४३ धावांची भागीदारी करून डाव सावरण्याचा प्रयत्न केला. वैष्णवीने ही जोडी फोडल्यानंतर झिम्बाब्वेची घसरण पुन्हा सुरू झाली. सायली आणि क्रांती यांनी प्रत्येकी दोन बळी घेत तिला मोलाची साथ दिली. अखेर ३९.५ षटकांत झिम्बाब्वेचा डाव १३१ धावांवर संपुष्टात आला.

वैष्णवीने मालिकेतील दोन सामन्यांत एकूण नऊ बळी मिळवून आपली क्षमता सिद्ध केली. तिची ही कामगिरी केवळ सामन्यापुरती मर्यादित नसून भारतीय गोलंदाजीच्या भविष्यातील पर्यायांच्या दृष्टीनेही महत्त्वाची आहे.

प्रतिकाचे सातत्य, शेफालीचा स्फोटक आविष्कार!

१३२ धावांचे लक्ष्य भारतासाठी फार मोठे नव्हते; मात्र यस्तिका भाटिया पहिल्याच चेंडूवर बाद झाल्याने सुरुवातीलाच धक्का बसला. दोन वर्षांनंतर एकदिवसीय संघात पुनरागमन करणाऱ्या यस्तिकाला खातेदेखील उघडता आले नाही. प्रतिका रावल आणि हरलीन देओल यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला. हरलीनने १९ चेंडूंत १९ धावा केल्या; परंतु भारताची दुसरी विकेट ५९ धावांवर पडली. त्यानंतर प्रतिकाला शेफाली वर्माची साथ मिळाली आणि सामन्याचे चित्रच बदलले. प्रतिकाने संयमी फलंदाजी करत धावफलक हलता ठेवला, तर शेफालीने आक्रमक फटकेबाजीने झिम्बाब्वेच्या गोलंदाजांवर दबाव निर्माण केला. प्रतिकाने ५६ चेंडूंत नाबाद ५९ धावा केल्या. शेफालीने अवघ्या २६ चेंडूंत नाबाद ५१ धावांची आतषबाजी केली. तिच्या खेळीत सहा चौकार आणि तीन षटकारांचा समावेश होता. तिने केवळ २४ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. भारतीय महिला एकदिवसीय क्रिकेटमधील हे दुसऱ्या क्रमांकाचे वेगवान अर्धशतक ठरले.

या दोघींनी तिसऱ्या गड्यासाठी अवघ्या ५० चेंडूंत नाबाद ७४ धावांची भागीदारी केली आणि भारताने १७ षटकांत दोन गडी गमावून १३३ धावा करत विजय मिळवला. लक्ष्याचा पाठलाग करताना तब्बल १९८ चेंडू शिल्लक राहिले, ही भारतीय फलंदाजीच्या वर्चस्वाची ठळक साक्ष आहे.

मालिकेतील प्रमुख आकडेवारी

मालिकेचा निकाल : भारताचा एकदिवसीय मालिकेत ३-० असा विजय; टी-२० मालिकेतही ३-० अशीच सरशी.

वैष्णवी शर्मा : निर्णायक सामन्यात पाच बळी; मालिकेतील दोन सामन्यांत एकूण नऊ बळी.

प्रतिका रावल : मालिकेत २२० धावा; सर्वाधिक धावा करणारी फलंदाज आणि मालिकावीर.

शेफाली वर्मा : मालिकेत १२३ धावा; अंतिम सामन्यात २६ चेंडूंत नाबाद ५१ धावा.

वेगवान अर्धशतक : शेफालीचे २४ चेंडूंत अर्धशतक.

झिम्बाब्वेचा डाव : ३९.५ षटकांत १३१ धावा.

भारताचा विजय : १७ षटकांत १३३ धावा, दोन गडी बाद.

निर्णायक भागीदारी : प्रतिकाझेशफाली यांची ५० चेंडूंत नाबाद ७४ धावांची भागीदारी.

विजय मोठा; पण पुढील आव्हानेही महत्त्वाची!

या मालिकेत प्रतिकाचे सातत्य, शेफालीची आक्रमकता आणि वैष्णवीची बळी मिळवण्याची क्षमता या भारताच्या प्रमुख जमेच्या बाजू ठरल्या. गोलंदाजांनी प्रतिस्पध्यांर्ला कमी धावांत रोखले आणि फलंदाजांनी लक्ष्याचा पाठलाग करताना अनावश्यक वेळ न घालवता सामना संपवला. ही सांघिक कामगिरी निश्चितच कौतुकास्पद आहे.

मात्र, झिम्बाब्वेविरुद्धचा व्हाइटवॉश म्हणजे भारतीय संघाच्या सर्व उणिवा दूर झाल्या, असे मानणे योग्य ठरणार नाही. तुलनेने बलाढ्य प्रतिस्पर्ध्यांविरुद्धही अशीच कामगिरी कायम राखणे, मधल्या फळीची सातत्यपूर्ण उपयुक्तता सिद्ध करणे आणि गोलंदाजीतील विविध पर्याय अधिक प्रभावी बनवणे, ही पुढील आव्हाने असतील.

तरीही या दौऱ्याने भारतीय महिला क्रिकेटची वाढती ताकद स्पष्ट केली आहे. टी-२० आणि एकदिवसीय अशा दोन्ही मालिकांत एकही सामना न गमावता मिळवलेले यश, नव्या खेळाडूंची प्रभावी कामगिरी आणि अनुभवी फलंदाजांची जबाबदार साथ हे भारतीय क्रिकेटसाठी आश्वासक चित्र आहे.

थोडक्यात, झिम्बाब्वेविरुद्धचा हा व्हाइटवॉश केवळ दोन मालिकांतील विजय नसून भारतीय महिला क्रिकेटमधील गुणवत्ता, आत्मविश्वास आणि सांघिक सामर्थ्याचा ठळक आविष्कार आहे. आता या वर्चस्वाचे रूपांतर बलाढ्य संघांविरुद्धच्या सातत्यपूर्ण यशात करणे, हेच भारतीय महिलांसमोरील खरे आव्हान असेल!

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

शिक्षक समितीच्या आंदोलनाचा दणका!

७५ टक्के मागण्या आठ दिवसांत निकाली काढण्याचे प्रशासनाचे आश्वासन

जिल्हा परिषद अध्यक्षांच्या दालनात दोन तास मॅरेथॉन चर्चा, २९ ऑक्टोबरचे सत्याग्रह व धरणे आंदोलन स्थगित



दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या वतीने शिक्षकांच्या विविध प्रलंबित सेवाविषयक, वेतनविषयक आणि शाळांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित मागण्यांसाठी सातत्याने सुरू असलेल्या पाठपुराव्याला महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे. समितीच्या आंदोलनाची दखल घेत जिल्हा परिषद अध्यक्षांच्या दालनात बुधवारी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत तब्बल दोन तास सविस्तर चर्चा झाली. यावेळी सुमारे ७५ टक्के मागण्या आठ दिवसांत निकाली काढण्याबाबत प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतली असून, तातडीने कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे २९ ऑक्टोबर रोजी नियोजित एकदिवसीय सत्याग्रह व धरणे आंदोलन तूर्तास स्थगित करण्याचा निर्णय शिक्षक समितीने घेतला आहे.

जिल्हा परिषद गोंदियाचे अध्यक्ष लायकरामजी भेंडारकर, उपाध्यक्ष सुरेशजी हर्षे आणि शिक्षणाधिकारी पवन खंडारे यांच्या पुढाकाराने आयोजित या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.नि दोंदुला, मुख्य लेखा व वित्त अधिकारी पंधरे, उपशिक्षणाधिकारी मोटघरे, प्रशासन अधिकारी सौरभ अग्रवाल यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. शिक्षक समितीच्या शिष्टमंडळाने शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांची वस्तुस्थिती मांडत त्यावर कालबद्ध निर्णय घेण्याची मागणी केली.प्राथमिक शिक्षकांना एकस्तर पदोन्नतीअंतर्गत S-14 वेतनश्रेणी लागू करणे, २१ एप्रिल २०२६ च्या आदेशावरील स्थगिती उठविण्यासाठी कार्यवाही करणे आणि वेतनातील तफावत दूर करणे, या महत्त्वाच्या मागणीवर सकारात्मक चर्चा झाली.

संबंधित प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आला असून, चार दिवसांत आदेश निर्गमित करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन देण्यात आले. थकबाकी मार्च महिन्यापूर्वी मिळवून देण्यासाठीही समिती पाठपुरावा करणार आहे. १२ व २४ वर्षांची सेवा पूर्ण केलेल्या शिक्षकांना मूळ रुजू दिनांकापासून चटोपाध्याय व निवडश्रेणीचा लाभ देण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. वासंदर्भात लवकरच शुद्धिपत्रक काढण्याचे आश्वासन देण्यात आले. तसेच चटोपाध्यायची १०० टक्के प्रलंबित प्रकरणे याच आठवड्यात निकाली काढण्याची ग्वाही प्रशासनाने दिली. निवडश्रेणीच्या यादीत वंचित राहिलेल्या १९ शिक्षकांसह पात्र शिक्षकांना लाभ देण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे. प्रत्येक वर्षनिहाय यादी तयार करून पंचायत समित्यांकडून आवश्यक माहिती मागविण्यात येत आहे. पदवीधर विषय शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणीचा लाभ, तसेच उर्वरित प्रलंबित प्रकरणे मार्गी लावण्याबाबतही चर्चा झाली.

आदिवासी उपाययोजनेत वेळोवेळी समाविष्ट झालेल्या गावांमध्ये कार्यरत शिक्षकांना एकस्तर वेतनश्रेणीचा लाभ मिळावा, या मागणीसंदर्भातील प्रस्ताव उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आला आहे. शाळांमधील स्वयंसेवकांचे मानधन आणि कालावधी वाढविण्याच्या मागणीवर चर्चा झाली. वासाठी ४० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली असून, संबंधित फाइल शिक्षण विभागाकडून सादर करण्यात येणार आहे. ज्या शाळांमध्ये नवीन शिक्षक अद्याप रुजू झालेले नाहीत, त्या शाळांतील स्वयंसेवकांचा कालावधी वाढविण्याबाबतही कार्यवाही केली जाणार आहे.बैठकीत शिक्षकांच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीची प्रलंबित देयके, सेवासातत्याची प्रकरणे, अतिरिक्त घरभाडे भत्त्याची थकबाकी, GPF ऑनलाइन करणे, शाळांना १६व्या वित्त आयोगातून मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे आणि नवनियुक्त शिक्षकांच्या वैद्यकीय प्रमाणपत्रासाठी शिबिर आयोजित करणे या मुद्द्यांवर चर्चा झाली. अर्जुनी मोर तालुक्यासह विविध तालुक्यांतील सन २०२२-२३ पासून प्रलंबित पोषण आहार देयकांसाठी शासनाकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन देण्यात आले. मार्च महिन्यात तीन वर्षांची अर्हताकालीन सेवा पूर्ण करणाऱ्या शिक्षकांच्या नियमित वेतनश्रेणीच्या प्रस्तावांची जानेवारीतच मागणी करून मार्चमध्ये लाभ देणे, एप्रिल महिन्यातील स्पर्धापरीक्षा विजेत्यांना बक्षिसाची रक्कम देणे, नावात बदलासंबंधीची प्रकरणे तातडीने निकाली काढणे आणि माहितीचा शनिवार अंतर्गत इतर दिवशी कमी प्रमाणात माहिती मागविणे, या विषयांवरही सकारात्मक चर्चा झाली. जिल्हा परिषद शिक्षकांना सन्मानपूर्वक वागणूक देण्याबाबत संबंधित गटशिक्षणाधिकाऱ्यांना पत्र देण्याचे आश्वासनही प्रशासनाकडून देण्यात आले.

बैठकीत सकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल जिल्हा परिषद अध्यक्ष लायकरामजी भेंडारकर, उपाध्यक्ष सुरेशजी हर्षे, मुख्य कार्यकारी अधिकारी झेनिथ दोंदुला, जिल्हा परिषद पदाधिकारी सदस्य रचनाताई गहाणे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी पंधरे, शिक्षणाधिकारी पवन खंडारे, उपशिक्षणाधिकारी मोटघरे आणि प्रशासन अधिकारी सौरभ अग्रवाल यांचे शिक्षक समितीच्या वतीने आभार मानण्यात आले.

या बैठकीला महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष संदीप तिडके, विभागीय अध्यक्ष किशोर डोंगरवार, सरचिटणीस संदीप मेश्राम, जिल्हानेते एच. एस. बिसेन, कोषाध्यक्ष उत्तम टेंभरे, कार्याध्यक्ष मुकेश रहांगडाले, जिल्हा पदाधिकारी अशोक बिसेन, राजेंद्र बोपचे, संघटक राज कडव, यू. जी. रहांगडाले, शोभेलाल ठाकूर, दिलीप लोदी, तारेंद्र टेंभूरणे, ओमप्रकाश नांदनवार, तालुका उपाध्यक्ष ओ. बी. मस्के, जिल्हामार्गदर्शक मंगेश पर्वते, गणेश कांगणे यांच्यासह समितीचे पदाधिकारी व शिक्षक बांधव उपस्थित होते.

रामटेकच्या १० साधकांची नागपूर ते नाणीज ११०० किलोमीटर पायी वसुंधरा दिंडी



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांच्या संप्रदायातील रामटेक तालुक्यातील १० साधकांनी नागपूरच्या सुमारे ५०० साधकांसोबत वसुंधरा पायी दिंडीत सहभागी होत ११०० किलोमीटरचा प्रवास पूर्ण केला. १२ सप्टेंबर ते २४ ऑक्टोबरदरम्यान ही दिंडी उपपीठ पूर्व विदर्भ, नेरला जिल्हा नागपूर येथून श्री क्षेत्र नाणीजधाम, जि. रत्नागिरी येथे पोहोचली. सुमारे ४० दिवसांचा पायी प्रवास पूर्ण केल्यानंतर ४५व्या दिवशी उपपीठ पूर्व विदर्भ, झिल्पी मोहगाव हिंगणा ,येथे दिंडीचा समारोप झाला. या पायी वारीत सहभागी झालेल्या रामटेकच्या साधकांचा उत्साह वाढविण्यासाठी २६ ऑक्टोबर रोजी लांबे हनुमान मंदिर, रामटेक येथे स्वागत व सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला.

यावेळी प्राध्यापिका रेणुका देशपांडे, आचार्य श्रीपाद गुरुजी, नगरपरिषद उपाध्यक्ष आलोक मानकर यांच्यासह रामानंद संप्रदायातील साधक उपस्थित होते. सत्कार करण्यात आलेल्या साधकांमध्ये नारायण घरजाळे, शैलेश मंगर, देशराज मसराम, गुलाब उईके, श्रावण टेकाडे, दिनदयाल सरोते, प्रीतम राठोड, सुस्मिता सरोते, प्रभावती कुंभलकर आणि निशा भलावी यांचा समावेश आहे. पायी वारीदरम्यान अत्यंत आनंददायी अनुभव मिळाल्याची भावना साधकांनी व्यक्त केली. रामानंद संप्रदायाच्या वतीने कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

प्रकाशाच्या उत्सवात आनंदासोबतच सुरक्षिततेलाही द्या प्राथमिकता!

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

एकिकडे अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या प्रकाशपवासाठी घरोघरी पहाटेपासूनच कंदील, रोषणाई आणि फराळाच्या तयारीची लगबग सुरू आहे; तर दुसरीकडे महाराष्ट्रातील अनेक भागांत शेतात करपलेली पिके आणि पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करणाऱ्या माय-माउलींचे चित्र मनाला चटका लावणारे आहे. एका बाजूला आनंदाची उधळण सुरू असताना, दुसऱ्या बाजूला दुष्काळ आणि भीषण पाणीटंचाईच्या झळा सोसत असलेला बळीराजा आणि ग्रामीण भाग आशेचा किरण शोधत आहे.

याच पार्श्वभूमीवर, सणाचा उत्साह साजरा करताना दुसरीकडे घरात आणि परिसरात विजेची कोणतीही दुर्घटना घडू नये, यासाठी महावितरणचे नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी वीज ग्राहकांशी संवाद साधत सुरक्षेचे आवाहन केले आहे. सण कोणताही असो, प्रत्येक नागरिकाचा जीव आणि सुरक्षा महत्त्वाची असल्याची संवेदनशील भावना त्यांनी व्यक्त केली आहे.

आनंदाच्या आनंदात सुरक्षेची गाठः दिवाळीत घरोघरी रोषणाईचे दिवे झगमगतात, मात्र घाईगडबडीत किंवा उत्साहाच्या भरात होणारी छोटीशी घोडचूक संपूर्ण कुटुंबाचा घात करू शकते. विशेषतः ग्रामीण व दुष्काळग्रस्त भागांत अनेकदा शेतात किंवा घराजवळ तात्पुरत्या जोडण्या करून रोषणाई केली जाते. अशा वेळी वीजेचा अतिभार (ओव्हरलोड) किंवा जुन्या-तुटलेल्या वायर्समुळे शॉर्ट सर्किट होऊन आग लागण्याचा धोका वाढतो. त्यामुळे यंदाची दिवाळी खेळती आणि आनंदाची ठेवतानाच विजेच्या बाबतीत अत्यंत दक्षता बाळगणे गरजेचे ठरले आहे.

साफसफाई आणि रंगरंगोटी करताना काळजी

सणाच्या तोंडावर घराची स्वच्छता करताना भिंतींना रंग देताना स्विच बोर्ड किंवा सॉकेट्सची विशेष काळजी घ्या. रंग देताना मुख्य वीज पुरवठा बंद ठेवा आणि वापरली जाणारी शिडी कोणत्याही लाईव्ह वायरला स्पर्श करणार नाही याची खबरदारी घ्या. घरात उंदरांनी कुरतडलेल्या तारा किंवा सैल झालेले प्लग असतील, तर ते लवकरात लवकर बदलून घ्या, जेणेकरून कोणत्याही दुर्दैवी घटनेला थार मिळणार नाही.

पाण्याच्या संघर्षामुळे वीज यंत्रणेवर वाढलेला ताण:

दुष्काळामुळे पाण्याची भीषण टंचाई असलेल्या भागांत विहिरी आणि बोअरवेलवरून पाणी आणताना किंवा चालू-बंद करताना वीज यंत्रणेचा वापर वाढतो. अशा संवेदनशील परिस्थितीत वीज वाहिन्यांजवळ किंवा ट्रान्सफॉर्मरजवळ कोणत्याही प्रकारची जोखीम पत्करणे टाळावे. लहान मुलांना जीवंत तारा आणि उपकरणांपासून दूर ठेवावे. फटाके उडवतानाही वीज तारा आणि खांबांपासून सुरक्षित अंतर राखणे अत्यंत आवश्यक आहे.

संकटाच्या काळातही वीज यंत्रणा सतर्क

एकिकडे दुष्काळी परिस्थितीचे मळभ असताना, दुसरीकडे ग्राहकांना या उत्सवात विनाखंड वीजपुरवठा मिळावा, यासाठी महावितरणचे अधिकारी व कर्मचारी तजवीज ठेवून सज्ज आहेत. बाजारपेठा आणि गावोगावी सुरक्षेची काळजी घेण्यासाठी यंत्रणा सतर्क ठेवण्यात आली आहे.

सण हा आनंदाचा आणि उजेडाचा आहे. मात्र, हा उजेड प्रत्येकाच्या आयुष्यात सुरक्षिततेचा आणि आशेचा किरण बनो, यासाठी यंदाच्या दिवाळीत रोषणाई करतानाच विजेच्या सुरक्षेलाही प्राधान्य देऊया, जेणेकरून कोणत्याही कुटुंबावर दुःखाचे सावट येणार नाही!

थोडक्यात

कोजागिरी स्नेहमिलन व श्रीमंत यशवंतराव होळकर पुण्यतिथी कार्यक्रम उत्साहात संपन्न

१५० ते २०० समाजबांधवांची उपस्थिती; आरोग्य व समाजसेवेतील ३१ वर्षांच्या योगदानाबद्दल वंदना बर्डे यांचा गौरव



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृती समिती, सौभाग्य नगर, नागपूर यांच्यावतीने बुधवार, दिनांक २८ ऑक्टोबर २०२६ रोजी अहिल्या मंदिर येथे कोजागिरी पौर्णिमेनिमित्त स्नेहमिलन व सुरुची भोजनाचा कार्यक्रम तसेच महान मराठा सरदार, लोकनायक श्रीमंत यशवंतराव होळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला सुमारे १५० ते २०० समाजबांधवांनी उपस्थित राहून स्नेहमिलनाचा आनंद घेतला. कोजागिरी पौर्णिमेच्या मंगलमय वातावरणात आयोजित या कार्यक्रमातून समाजातील एकोपा, बंधुभाव, परस्पर सहकार्य आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. उपस्थित समाजबांधवांनी एकत्र येत आपुलकीच्या वातावरणात संवाद साधला. दुधाचा प्रसाद आणि सुरुची भोजनाचा आस्वाद घेत सर्वांनी या स्नेहमिलनाचा आनंद लुटला. कार्यक्रमात महान मराठा सरदार व लोकनायक श्रीमंत यशवंतराव होळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या शौर्य, पराक्रम, नेतृत्वगुण आणि ऐतिहासिक कार्याचे स्मरण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. त्यांच्या कर्तृत्वातून प्रेरणा घेऊन समाजाने संघटितपणे प्रगती साधावी, तसेच त्यांच्या ऐतिहासिक वारशाची ओळख नव्या पिढीपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

आरोग्यसेवा आणि समाजसेवेच्या क्षेत्रात तब्बल ३१ वर्षे उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल त्यांना 'युनिव्हर्सल ऑनरी अवॉर्ड कौन्सिल'तर्फे मानद डॉक्टरेट पदवीने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या गौरवपूर्ण यशाबद्दल पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृती समितीच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. समितीचे कार्याध्यक्ष रमेशजी ढवळे आणि सचिव महादेवजी पातोंड यांच्या हस्ते वंदना बर्डे यांचा सन्मान करून त्यांच्या प्रदीर्घ सेवाकार्याचे कौतुक करण्यात आले. आरोग्यसेवेच्या माध्यमातून रुग्णांची सेवा आणि सामाजिक कार्याच्या माध्यमातून गरजू व्यक्तींना मदत करण्याचे त्यांचे योगदान समाजासाठी प्रेरणादायी असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. वंदना बर्डे यांना प्राप्त झालेली मानद डॉक्टरेट पदवी ही त्यांच्या आरोग्य व समाजसेवेतील कार्याचा गौरव असल्याचे नमूद करून उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सामाजिक एकजुटीचा प्रेरणादायी उपक्रम कोजागिरी पौर्णिमेचा आनंद, ऐतिहासिक महापुरुषांच्या कार्याचे स्मरण आणि समाजासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान अशा त्रिवेणी संगमामुळे या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. सुमारे १५० ते २०० समाजबांधवांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. अशा स्नेहमिलनाच्या कार्यक्रमांमुळे समाजातील परस्पर संबंध अधिक दृढ होतात, सामाजिक कार्यांना चालना मिळते आणि नव्या पिढीसमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण होतात. कार्यक्रमाचे आयोजन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृती समिती, सौभाग्य नगर, नागपूर यांच्या वतीने करण्यात आले.

नलिनी गंगाधरराव सराफ यांचे निधन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नलिनी गंगाधरपंत सराफ राहणार अमरावती यांचे वृद्धापकाळने वयाच्या १०४ व्या वर्षी पायोनियर सोस. चिचभवन येथील मुलाच्या घरी आज २९ ऑक्टोबर रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात तिनं मुले सुना, नातू तसेच बराच मोठा आप्त परिवार आहे. अंत्यसंस्कार सहकारनगर घाटावर पार पडले.

'माझा आवाज' वक्तृत्व स्पर्धेत महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयाचे यश!



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

रामटेक तालुक्यातील भंडारबोडी जिल्हा परिषद, नागपूर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या माझा आवाज जिल्हास्तरीय आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा २०२६ मध्ये महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय, भंडारबोडी येथील विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले. या स्पर्धेत रुचिका अरुण कडबे हिने तालुकास्तरावर प्रथम क्रमांक पटकावून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड मिळविली. तसेच गुडीया बलिवान खरकाटे हिने शिवनी केंद्रातून प्रथम क्रमांक मिळवून दोन्ही विद्यार्थिनींनी विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. दोन्ही विद्यार्थिनींनी आपल्या वक्तृत्व कौशल्याच्या जोरावर मिळविलेल्या या यशामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील प्रगतीला नवी दिशा मिळाली आहे. त्यांच्या या यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व शाळा व्यवस्थापनाने अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थिनींच्या या यशामुळे विद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

काटोल येथे १ नोव्हेंबरला गुणवंत विद्यार्थी, सेवानिवृत्त व ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान सोहळा

अखिल भारतीय भोयर, पवार महासंघ काटोलकडून आयोजन

दै. सिंहवाणी वृत्त, काटोल

अखिल भारतीय भोयर, पवार महासंघ, शाखा काटोल तसेच महिला मंडळ, सल्लागार मंडळ आणि समस्त भोयर, पवार, पोवार परिवार, काटोल यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दिनांक १ नोव्हेंबर २०२६ रोजी गुणवंत विद्यार्थी सत्कार, सेवानिवृत्त कर्मचारी व ज्येष्ठ नागरिक सन्मान आणि समाज स्नेहमिलन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

स्थानिक नबीरा ले आउटमधील राजा भोज बाल संस्कार भवन येथे सकाळी ११ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत हा कार्यक्रम होणार आहे.

या कार्यक्रमाचे यंदा २६ वे वर्ष असून समाजातील गुणवंतांचा गौरव, ज्येष्ठांचा सन्मान आणि सामाजिक एकोपा वृद्धिंगत करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय भोयर पवार महासंघ, नागपूरचे अध्यक्ष मा. डॉ. नामदेवराव राऊत राहणार आहेत. कार्यक्रमाचे उद्घाटन काटोल-नरखेड विधानसभा क्षेत्राचे आमदार चरणसिंगजी ठाकूर यांच्या हस्ते तर आर्वी विधानसभा क्षेत्राचे आमदार सुमित वानखेडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. काटोल येथील कृ.उ.बा.स.चे संचालक दिनेश ठाकरे हे 'शेती व शेतकरी लाभांच्या योजना' या विषयावर विशेष मार्गदर्शन करणार आहेत.

या सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून जि.प. वर्धाच्या माजी अध्यक्षा सरिताताई विजयराव गाखरे, नागपूर महानगरपालिकेच्या नगरसेविका वर्षाताई घनश्यामजी चौधरी, राष्ट्रीय क्षेत्रिय पवार महासंघ (भारत)चे युवा अध्यक्ष दारासिंगजी कटरे, काटोल पंचवटी प्रभागाचे नगरसेवक सुभाषजी कोठे, सामाजिक कार्यकर्त्या पद्माताई श्रावणजी खवसे, नरखेड तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते अनिलजी शा. काटोले आणि काटोल पंचायत समितीच्या माजी सदस्या लताताई प्रमोदराज धारपुरे उपस्थित राहणार आहेत.

शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा तसेच समाजासाठी योगदान देणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांचा या कार्यक्रमात सन्मान करण्यात येणार आहे. शैक्षणिक गुणवत्तेला प्रोत्साहन देणे, विद्यार्थ्यांमध्ये पुढे जाण्याची प्रेरणा निर्माण करणे आणि ज्येष्ठांच्या अनुभवाचा सन्मान करणे, या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

सत्कारमूर्तींमध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळाचे ऑपरेटर कृष्णाजी देशमुख, गुरुस्मृती माध्यमिक विद्यालय रामटीचे मुख्याध्यापक श्यामजी बन्नगरे, ज्येष्ठ नागरिक तुकारामजी खवसे, निर्मलाताई गाडगे रामकृष्णाजी पठाडे, शिव कन्स्ट्रक्शन, काटोलचे यशस्वी बांधकाम व्यावसायिक शिवजी पटले आणि मेटपांजरा येथील केंद्रप्रमुख अनंतकुमार धारपुरे यांचा समावेश आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सकाळी ११ ते दुपारी १२ या वेळेत सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये गायन, नृत्य आदी कलाविष्कार सादर केले जाणार आहेत. त्यानंतर दुपारी १२ वाजता मुख्य कार्यक्रम होणार असून सायंकाळी ३ वाजता स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता होईल.

भोयर, पवार, पोवार समाजातील विविध घटकांना एकत्र आणून परस्परांमध्ये स्नेह, सहकार्य आणि सामाजिक बांधिलकी वाढविणे, गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या कार्याचा गौरव करणे, या उद्देशाने हा सोहळा दरवर्षी आयोजित केला जातो. यंदाच्या २६ व्या वर्षानिमित्त गुणवंत विद्यार्थी, सत्कारमूर्ती आणि सर्व समाज बंधू-भगिनींनी कार्यक्रमाला सहपरिवार उपस्थित राहण्याचे आवाहन वसंत खवसे, मनोहर पठाडे, अर्जुन कडवे, अरुण मुने, वासुदेव चोपडे, मधुकर रमधम, दिलीप गाखरे, तिलकचंद डोबले, चित्तेश्वर ढोले, मंदा भादे कांचन रमधम, वर्षा ढोले, वनिता गोरे व अखिल भारतीय भोयर पवार महासंघ, शाखा काटोल कार्यकारिणीचे वतीने करण्यात आले आहे.

थोडक्यात

थायलंडहून आणलेल्या तथागत बुद्धमूर्तीची इंदरवाड्यात मंगल भेट!

वर्षावास समापन सोहळा उत्साहात; समता बुद्ध विहाराला बुद्धमूर्ती अर्पण, पंचक्रोशीतील नागरिकांसाठी भोजनदान व फळदान



दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड

भगवान गौतम बुद्धांनी जगाला दिलेला शांतता, करुणा, मैत्री आणि बंधुभावाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने नरखेड तालुक्यातील इंदरवाडा येथील समता बुद्ध विहारात वर्षावास समापन



उत्सव उत्साहात पार पडला. या मंगलमय सोहळ्याचे औचित्य साधून थायलंड देशातून आणलेली तथागत गौतम बुद्धांची मूर्ती गुलाबराव नाथुजी रोहनकर यांच्यातर्फे समता बुद्ध विहाराला मंगल भेट म्हणून अर्पण करण्यात आली. बुद्धमूर्तीच्या आगमनामुळे विहाराच्या परिसरात मंगलमय वातावरण निर्माण झाले. यानिमित्त पंचक्रोशीतील नागरिकांसाठी भोजनदान व फळदानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. वर्षावास समापन हा बौद्ध समाजाच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेतील महत्त्वाचा सोहळा मानला जातो. या निमित्ताने भगवान बुद्धांच्या विचारांचे स्मरण करून त्यांचे आचरण दैनंदिन जीवनात करण्याचा संदेश देण्यात आला. केवळ धार्मिक विधीपुरता मर्यादित न राहता दान, सेवा, सामाजिक एकोपा आणि मानवतेची भावना वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात आला. पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सोहळ्यात सहभाग घेतला.

कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून पूज्य भिक्खू डॉ. धम्मसेवक महाथेरो सोनी, श्रामणेर धम्मसरण तसेच वरूड येथील डॉ. वावलकर उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनातून तथागत गौतम बुद्धांच्या धम्मविचारांचे महत्त्व, पंचशीलाचे पालन, अहिंसा, समता आणि बंधुभाव यांविषयी मार्गदर्शन करण्यात आले. समाजात परस्परांविषयी आदरभाव निर्माण होण्यासाठी बुद्धांच्या शिकवणीचे आचरण आवश्यक असल्याचा संदेश यावेळी अधोरेखित करण्यात आला. याप्रसंगी पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण बंडूजी कोकाटे आणि आनंदराव सरदार यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर वर्षावास समापनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात उपस्थितांनी सहभाग नोंदविला. भोजनदान आणि फळदानाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत सर्वांना एकत्र आणण्याचा उपक्रम राबविण्यात आला. महिला, समाजबांधव आणि परिसरातील नागरिकांचा या सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

बुद्धमूर्तीच्या मंगल भेटीमुळे समता बुद्ध विहाराच्या धार्मिक-सामाजिक कार्याला नवी प्रेरणा मिळाली असून, भगवान बुद्धांच्या करुणा, समता आणि मानवतेच्या विचारांचा प्रसार करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. वर्षावास समापनाच्या निमित्ताने पार पडलेल्या या उपक्रमाने दानपारमिता, सामाजिक सलोखा आणि सामूहिक सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कपिल गुलाबराव रोहणकर, आनंदराव सरदार, धनंजय मेश्राम, बंडूजी कोकाटे, गोपाळराव काळबांडे, शंकरराव ढोणे, अनिल रक्षित, किशोर शेंडे, दिनेश शेंडे, अरुण शेंडे, अनिल नाईक, सूरज डोंगरे, किसनाजी शेंडे, रामचंद्राजी धवराळ, नरेंद्र धवराळ, केशवजी धवराळ, शंकरराव धवराळ, पवन गायकवाड, भरत मनोहरे, प्रज्वल शेंडे, अशोक शेंडे, अमित नांदगावे, राजू धवराळ, दादा शंकर दाभणे, आकाश जाटव यांच्यासह परिसरातील नागरिकांनी सहभाग नोंदविला. पंचक्रोशीतील नागरिकांच्या उपस्थितीत हा वर्षावास समापन सोहळा भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

पूजनीय गोळवलकर गुरुजी अकपब्लिक स्कूलमध्ये अकरोबोटिक्स लॅबचे उद्घाटन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देत त्यांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनवृत्ती आणि नवोपक्रमशीलता विकसित करण्याच्या उद्देशाने पूजनीय गोळवलकर गुरुजी अक पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, अभ्यंकरनगर, नागपूर येथे अक रोबोटिक्स लॅबचे उद्घाटन शुक्रवार, दिनांक ३० ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आले आहे.

या अकरोबोटिक्स लॅबचे उद्घाटन विधान परिषदेचे माजी आमदार संदीपजी जोशी यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून जिल्हा परिषद नागपूरचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता विभाग) कुणालजी उंदीरवाडे आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी अनिलजी दहिफळे उपस्थित राहणार आहेत. तसेच याप्रसंगी भारतीय विद्या प्रसारक संस्थेचे पदाधिकारी कृ. दा. पत्थरकीने, समीर महाजन, रमेश बक्षी आणि अतुल गाडगे , संध्या महाजन,यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

आजच्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता प्रत्यक्ष प्रयोग, रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि तंत्रज्ञानाचा माध्यमातून कौशल्याधारित शिक्षण देणे ही काळाची गरज आहे. या प्रयोगशाळेमुळे विद्यार्थ्यांना नवनवीन संकल्पना प्रत्यक्षात आणण्याची, समस्यांवर नाविन्यपूर्ण उपाय शोधण्याची आणि भविष्यातील तंत्रज्ञानासाठी सज्ज होण्याची संधी मिळणार आहे. 'संस्कृती, संस्कार आणि आधुनिक तंत्रज्ञान' यांचा समन्वय साधत विद्यार्थ्यांना भविष्यवेधी शिक्षण देण्याच्या दिशेने शाळेने उचललेले हे महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

जाम नदीच्या पुलाखाली ४० जिवंत काडतुसे आढळल्याने खळबळ!

भारसिंगी येथील घटना, सुरक्षा रक्षकाला लघुशंकेसाठी गेल्यानंतर दिसला काडतुसांचा साठा, पोलिसांकडून तपास सुरू

दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड

नरखेड तालुक्यातील जलालखेडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भारसिंगी येथील जाम नदीच्या पुलाखाली तब्बल ४० जिवंत काडतुसे आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. बुधवारी (२८ ऑक्टोबर) दुपारी साडेबारा वाजताच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. नदीच्या पुलाखाली एवढ्या मोठ्या प्रमाणात जिवंत काडतुसे आढळल्याने ही काडतुसे नेमकी कोणाची, ती येथे कोणी आणि कोणत्या उद्देशाने आणून ठेवली, याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.



भारसिंगी येथील जाम नदीवर नवीन पुलाचे बांधकाम सुरू आहे. या कामाच्या ठिकाणी सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत असलेला कर्मचारी बुधवारी दुपारी लघुशंकेसाठी पुलाखाली गेला असता, त्याला तेथे काडतुसे पडलेली दिसून आली. अचानक एवढ्या मोठ्या प्रमाणात काडतुसे नजरेस पडल्याने त्याने तातडीने आपल्या वरिष्ठांना याबाबत माहिती दिली. वरिष्ठांनी तत्काळ जलालखेडा पोलिसांना घटनेची माहिती कळविली.

घटनेची माहिती मिळताच जलालखेडा पोलीस ठाण्याचे ठाणेदार विनोद जांभळे हे पोलीस कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून तेथील ४० जिवंत काडतुसे जप्त केली. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन अपर पोलीस अधीक्षक अनिल मस्के यांनीही घटनास्थळी भेट देत पाहणी केली.

काडतुसे आली कुठून? तपासाचे आव्हान

जाम नदीच्या पुलाखाली जिवंत काडतुसे नेमकी कशी पोहोचली, ती कोणी आणून ठेवली आणि त्यामागे कोणता उद्देश होता, याचा अद्याप उलगडा झालेला नाही. ही काडतुसे कोणत्या प्रकारच्या शस्त्रासाठी वापरली जातात, त्यांचा पूर्वी कुठे वापर झाला आहे का आणि या प्रकरणाचा अन्य कोणत्या घटनेशी संबंध आहे का, या बाबी तपासातून स्पष्ट होणे आवश्यक आहे. मात्र, याबाबत अद्याप कोणताही निष्कर्ष समोर आलेला नाही.

परिसरात चर्चेला उधाण

पुलाच्या बांधकामाच्या ठिकाणी सुरक्षा रक्षकाला अचानक ४० जिवंत काडतुसे आढळल्याने भारसिंगीसह परिसरात विविध चर्चांना उधाण आले आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात काडतुसे नदीच्या पुलाखाली कोणी टाकली असावीत, याबाबत नागरिकांमध्ये उत्सुकता आणि चिंता व्यक्त होत आहे. या प्रकरणातील सत्य बाहेर आणण्यासाठी पोलिसांचा तपास महत्त्वाचा ठरणार आहे.

विशेष म्हणजे, या घटनेबाबत जलालखेडा पोलिसांकडे अधिक माहिती विचारली असता, त्यांनी सविस्तर माहिती दिली नाही. त्यामुळे काडतुसांचा प्रकार, त्यांचा स्रोत आणि तपासाची सद्यस्थिती याबाबत अधिकृत माहिती समोर येण्याची प्रतीक्षा आहे. आता या ४० जिवंत काडतुसांचे गूढ पोलिसांच्या तपासातून कधी उलगडते आणि या प्रकरणामागील सत्य काय समोर येते, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

शिवरायांच्या विचारांचा प्रभावी जागर; परिधी वाडबुदेची जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेसाठी निवड!

'माझा आवाज' स्पर्धेत दातेवाडीच्या विद्यार्थिनीची दमदार कामगिरी; 'शिवरायांकडून आजच्या पिढीने काय शिकावे?' या विषयावर प्रभावी वक्तृत्व

दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड

नरखेड तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, दातेवाडी येथील इयत्ता आठवीत शिकणाऱ्या कु. परिधी किनोद वाडबुदे हिने 'माझा आवाज' वक्तृत्व स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तालुकास्तरीय स्पर्धेत आपल्या प्रभावी वक्तृत्वाची छाप पाडत तिने जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड मिळविली. तिच्या या यशामुळे दातेवाडी शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, वडविहीरा गावासह संपूर्ण परिसरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

दि. २८ रोजी समूह साधन केंद्राच्या सभागृहात, नरखेड येथे माझा आवाज वक्तृत्व स्पर्धेचे तालुकास्तरीय आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत इयत्ता सहावी ते आठवी या गटातून कु. परिधी वाडबुदे हिने सहभाग घेतला. शिवरायांकडून आजच्या पिढीने काय शिकावे? हा अत्यंत महत्त्वपूर्ण विषय तिने आपल्या वक्तृत्वासाठी निवडला होता. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार, त्यांचे



स्वराज्याचे स्वप्न, धैर्य, शौर्य, न्यायप्रियता, स्त्रीसन्मान आणि लोककल्याणकारी राज्यकारभार यांसारख्या मूल्यांचा आजच्या पिढीने अंगीकार करण्याची गरज आपल्या प्रभावी भाषणातून तिने मांडली. विचारांची मांडणी, आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण आणि विषयावरील पकड यांमुळे परिधीने उपस्थितांची मने जिंकली. तिच्या या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत परीक्षकांनी तिच्या वक्तृत्वाचे कौतुक केले आणि जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी तिची निवड करण्यात आली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही उत्तम वक्तृत्वकौशल्य, नेतृत्वगुण आणि वैचारिक प्रगल्भता असल्याचे परिधीने आपल्या कामगिरीतून दाखवून दिले आहे.

परिधीच्या या यशामागे शाळेच्या मुख्याध्यापिका प्रतिभा मनकवडे यांचे मार्गदर्शन तसेच शिक्षकवृंदाचे परिश्रम महत्त्वाचे ठरले. शाळेतील शिक्षिका कु. वैशाली बोदडे मॅडम, कु. जमुना सानप आणि शिक्षक गणेश शेळके यांनीही तिला मार्गदर्शन केले. शाळा व्यवस्थापन समितीने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सहशालेय प्रगतीसाठी केलेल्या प्रयत्नांमुळे अशा गुणवंत विद्यार्थ्यांना आपले कौशल्य सादर करण्याची संधी मिळत आहे.

वक्तृत्व स्पर्धा ही केवळ भाषण करण्याची संधी नसून विद्यार्थ्यांमध्ये विचारशक्ती, आत्मविश्वास, संवादकौशल्य आणि सामाजिक जाणीव विकसित करणारे प्रभावी माध्यम आहे. अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांना महापुरुषांचे विचार समजून घेण्याची आणि ते आपल्या जीवनात उतरविण्याची प्रेरणा मिळते. परिधीच्या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही अभ्यासा बरोबरच विविध स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन मिळणार आहे.

जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाल्याने आता परिधीच्या पुढील कामगिरीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तिच्या या यशाबद्दल जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, दातेवाडीचे शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समिती, पालक आणि ग्रामस्थांनी तिचे अभिनंदन केले असून, जिल्हास्तरीय स्पर्धेतही ती यशाची नवी उंची गाठेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

याप्रसंगी गटशिक्षणाधिकारी विशाल पांढरे, शिक्षण विस्तार अधिकारी महेन्द्रकुमार भगत, परीक्षक ललिता सातपुते, केंद्रप्रमुख मिलिंद पावडे सर आणि केंद्रप्रमुख ईश्वरदास भादे यांच्या उपस्थितीत परिधीचा प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. मान्यवरांनी तिचे अभिनंदन करून आगामी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

लोधी समाज सेवा समिती आमगावच्या वतीने कोजागिरी व सत्कार समारंभ संपन्न!

राज्यस्तरीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्कारप्राप्त रोशनलाल लिल्हारे यांचा गौरव; शैक्षणिक व सामाजिक विकासावर मार्गदर्शन



दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा

लोधी समाज सेवा समिती आमगावच्या वतीने कोजागिरी व सत्कार समारंभाचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समितीचे संयोजक देवेंद्रसिंह मच्छिरके होते, तर समितीचे अध्यक्ष जागेश्वर लिल्हारे यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात वीरांगना राणी अवंतीबाई लोधी यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. समारंभाचे प्रमुख आकर्षण म्हणजे शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल राज्यस्तरीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने सन्मानित रोशनलाल लिल्हारे यांचा सत्कार हा होता. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल उपस्थित समाजबांधव व पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून आलोक महाराष्ट्र प्रदेशचे अध्यक्ष नरेंद्रकुमार लिल्हारे, आलोकचे राष्ट्रीय वरिष्ठ महिला उपाध्यक्ष सौ. सुखवंता बनोटे, राष्ट्रीय महिला सदस्य दीपा मच्छिरके, सामाजिक कार्यकर्ते दिनेश ढेकवार, सुनीता लिल्हारे, आलोक महाराष्ट्र प्रदेशचे संयोजक रोशनलाल लिल्हारे, उपाध्यक्ष ज्ञानिराम बनोठे, आलोक महाराष्ट्र प्रदेशचे मीडिया प्रभारी राजकुमार बसोने, समितीचे सचिव रोशन गराडे, कोषाध्यक्ष युवराज बसोने, सहसचिव केवलचंद मच्छिरके, संचालक तोषलाल लिल्हारे, रामचंद्र लिल्हारे, जयेश लिल्हारे, कवी हेमंत मोहारे, पुष्पा ढेकवार व प्रीती लिल्हारे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लोधी समाज सेवा समिती आमगावचे सचिव रोशन गराडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन कवी हेमंत मोहारे यांनी केले.

'सर्व्हिस ऑन व्हील्स'ने नागपूरमध्ये सेवा भागीदारांसाठी प्रशिक्षण आणि चर्चासत्र मेळाव्याचे आयोजन

असंघटित घरगुती सेवा क्षेत्राला संघटित करण्याचे आणि अर्धकुशल कामगारांना रोजगाराच्या चांगल्या संधी उपलब्ध करून देण्याचे उपक्रम

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

'सर्व्हिस ऑन व्हील्स' (रडह) या घर दुरुस्ती आणि घरपोच सेवा देणाऱ्या कंपनीने नागपूरमधील 'बँक्वेट फॉर्च्युन रीगल' येथे आपल्या सेवा भागीदारांसाठी एका विशेष प्रशिक्षण आणि चर्चासत्राचे आयोजन केले. घरगुती सेवा क्षेत्रातील तंत्रज्ञ आणि अर्ध-कुशल कामगारांना योग्य प्रशिक्षण देणे, त्यांची कार्यक्षमता वाढवणे आणि डिजिटल माध्यमांद्वारे त्यांना रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध करून देणे, हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

हा कार्यक्रम 'सर्व्हिस ऑन व्हील्स'चे संचालक अर्पण कटकवार आणि मुक्ता कटकवार यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आला होता. श्रीमती प्रतिभा शिरसाट प्रमुख पाहुण्या होत्या.

डिजिटल माध्यमांद्वारे रोजगाराच्या नवीन संधी

'सर्व्हिस ऑन व्हील्स'चा उद्देश प्लंबिंग, इलेक्ट्रिकल, घरगुती उपकरण दुरुस्ती आणि इतर घरगुती सेवा तंत्रज्ञांसाठी एक संघटित व्यासपीठ उपलब्ध करून देणे आहे, जे अनेकदा असंघटित क्षेत्रात काम करतात. ही कंपनी अर्ध-कुशल कामगारांना प्रशिक्षण, तांत्रिक मार्गदर्शन आणि ग्राहकांपर्यंत डिजिटल पद्धतीने पोहोचण्याची संधी देण्यासाठी कार्यरत आहे. प्रशिक्षण सत्रादरम्यान, सेवा भागीदारांना मोबाईल ॲपद्वारे प्राप्त झालेले सर्व्हिस लीड्स कसे स्वीकारावे, बुकिंग कसे स्वीकारावे आणि ग्राहकांशी प्रभावीपणे संवाद कसा साधावा हे शिकवले गेले. त्यांना दर्जेदार काम, वेळेवर सेवा पूर्ण करणे, ग्राहक प्रतिबद्धता आणि व्यावसायिक काम यावरही



मार्गदर्शन करण्यात आले.

तंत्रज्ञांना आत्मनिर्भर बनवण्याचा उपक्रम

या कार्यक्रमात यावर भर देण्यात आला की, योग्य प्रशिक्षण, तंत्रज्ञान आणि पद्धतशीर दृष्टिकोनाद्वारे, घरगुती सेवा क्षेत्रातील कर्मचारी आपली कार्यक्षमता आणि कमाईच्या संधी सुधारू शकतात. 'सर्व्हिस ऑन व्हील्स' तंत्रज्ञांना केवळ कामच नव्हे, तर त्यांची कौशल्ये विकसित करण्याची आणि अधिक संघटित व व्यावसायिक पद्धतीने आपले काम करण्याची संधी देण्याचा प्रयत्न करते.

अशा प्रशिक्षण कार्यक्रमांच्या माध्यमातून, कंपनी आपल्या सेवा भागीदारांना डिजिटल तंत्रज्ञानाशी जोडणे, त्यांच्या समस्या समजून घेणे आणि सेवा वितरणाची गुणवत्ता सुधारणे या दिशेने कार्यरत आहे.

सर्व्हिस ऑन व्हील्सची संपूर्ण टीम आणि कर्मचारी या कार्यक्रमात उत्साहाने सहभागी झाले. परस्पर समन्वय, समर्पण आणि जबाबदारीने, सर्व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या विविध व्यवस्था यशस्वीपणे सांभाळल्या आणि हा कार्यक्रम सुसंघटित व यशस्वी होण्यास महत्त्वपूर्ण योगदान दिले.

थोडक्यात

एमएसएमई क्षेत्राला आयपीओपर्यंत पोहोचण्यासाठी 'एमएसएमई राइज-२०२६'चे आयोजन

उद्योगविस्तार, व्यवसायाचे मूल्यवर्धन आणि भांडवली बाजारातून निधी उभारणीवर होणार मार्गदर्शन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

द इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडिया च्या वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिल अंतर्गत एमएसएमई व स्टार्टअप प्रमोशन कमिटी तसेच नवी दिल्ली येथील संस्थेच्या एमएसएमई व स्टार्टअप प्रमोशन बोर्ड यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी, ३१ ऑक्टोबर रोजी, हॉटेल सेंटर पॉइंटमध्ये एमएसएमई राइज-२०२६ या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

उत्कर्ष - उद्योगापासून आयपीओपर्यंत : व्यवसायविस्तार, मूल्यवर्धन आणि भांडवल उभारणी ही या परिषदेची संकल्पना आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना आर्थिक नियोजन, खर्च व्यवस्थापन, व्यवसायाचे मूल्यांकन, उद्योगविस्तार आणि भांडवली बाजारातून निधी उभारणी यासंदर्भात व्यावहारिक मार्गदर्शन करणे हा या परिषदेचा मुख्य उद्देश आहे. परिषदेतील प्रमुख आकर्षण म्हणजे भांडवली बाजार आणि जलद न्यायप्रक्रिया एमएसएमईच्या विकासाला गती देऊ शकतात का? या विषयावरील परिसंवाद. यात नॅशनल स्टॉक एक्स्चेंज, सेबी, बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज, असोसिएशन ऑफ इन्व्हेस्टमेंट बँकर्स ऑफ इंडिया यांचे वरिष्ठ प्रतिनिधी, तसेच उद्योजक आणि कायदेतज्ज्ञ सहभागी होणार आहेत. या परिसंवादात उद्योगांसाठी भांडवलाची उपलब्धता, एसएमई आयपीओच्या संधी, गुंतवणूकदारांचा विश्वास आणि व्यावसायिक वादांचे वेळेत निराकरण या महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा होईल. तसेच कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट्सची उद्योगांच्या आर्थिक व्यवस्थापनातील भूमिका, खचार्तील स्पर्धात्मकता, व्यवसायाचे मूल्यांकन आणि शाश्वत विकासासाठी आवश्यक आर्थिक शिस्त यावरही भर दिला जाणार आहे. केवळ नियमित अनुपालनापुरते मर्यादित न राहता, उद्योगांनी पारदर्शक कारभार, सक्षम आर्थिक पाया आणि दूरदृष्टीच्या आधारे विस्तार साधावा, हा या परिषदेचा संदेश आहे. उद्योगापासून आयपीओपर्यंतचा प्रवास यशस्वी करण्यासाठी योग्य खर्च व्यवस्थापन, भक्कम आर्थिक नियोजन, पारदर्शक प्रशासन आणि विकासाची स्पष्ट दिशा आवश्यक असल्याचे या परिषदेत अधोरेखित केले जाणार आहे. असे पत्रकार परिषदेत सीएमए मनीषा अग्रवाल सोबत चेअरमन रजत नायडू आणि सचिव मनिष पांडे यांनी सांगितले आहे.

ज्येष्ठांनी घेतले खाटू श्यामचे दर्शन



दै. सिंहवाणी वृत्त, काटोल/कोंढाळी

जेष्ठांना विरंगुळा मिळावा या उद्देशाने मागच्या सहा वर्षापासून काटोल तालुक्यातील जेष्ठ नागरिक व मित्रमंडळीची विविध ठिकाणी सहल काढून देवदर्शन व नैसर्गिक सौंदर्य पाहण्याचा लाभ मिळवून देण्याचे कार्य जेष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष गजानन भोयर करीत आहेत. या वर्षी सुद्धा त्यांनी ९४ ज्येष्ठांना सोबत घेऊन दोन लक्झरी बसद्वारा मध्यप्रदेश व राजस्थान या राज्यात दिनांक २१ ते २८ ऑक्टोबर दरम्यान सहलीचे आयोजन केले होते. सहलीची सुरुवात उज्जैनच्या महाकाल दर्शनाने झाली. मंदसौर येथील प्रति पशुपतिनाथ मंदिराचे दर्शन घेऊन राजस्थान या राज्यात प्रवेश केला. तेथे चित्तोडगड किल्ला पाहून सावलीया सेठ दर्शन घेतले.उदयपूर येथील लेक मध्ये बोटिंगचा आनंद घेऊन सिटी पॅलेस, कठपुतली शो पहिले. हल्दीघाटी येथील महाराणाप्रताप व त्यांचा चेतक घोडा यांचे शौर्याबाबत चित्रफित पहिली. नाथद्वारा येथील श्रीनाथाचे दर्शन,पुष्कर येथील ब्रह्मदेव मंदिर, अजमेर येथील ख्वाजा मोईनुद्दीन चीस्ती दर्गा, खाटू श्याम दर्शन घेतले. जयपूर येथील आमेर किल्ला,दिवाणे खास, दिवाने आम, राणी महाल पाहिला त्याशिवाय बिर्ला मंदिर व जलमहल पाहण्याचा आनंद लुटला. इतर साईड सीन पाहिल्यानंतर परतीच्या प्रवासात ओंकारेश्वर ज्योतिर्लिंगचे दर्शन घेतल्यानंतर नर्मदा नदीच्या पात्रात बोटिंगचा आनंद लुटला शेवटी खंडवा येथील दादाजी धुनिवाले यांचे समाधी दर्शन घेतले.

या सहलीच्या आयोजनात मंडळाचे उपाध्यक्ष सूर्याजी राऊत यांचे तसेच मंडळाचे सदस्य तुकाराम डवरे यांचे विशेष सहकार्य लाभले. पांडे टूर्स अँड ट्रॅव्हल्स वरुड यांनी लक्झरी बसेस द्वारे प्रवासाची, हॉटेलमध्ये राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था केलेली होती. सूर्याजी राऊत यांनी सहलीचे समालोचन करून सहप्रवाशांनी उत्तम सहकार्य दिल्याबद्दल त्यांचे धन्यवाद मानले. एकूणच प्रवास आनंददाई सुखरूप झाला असल्याचे मनोगत सह प्रवाशांनी व्यक्त केले. तसेच पुढील वर्षी सुद्धा अशीच नाविन्यपूर्ण सहल काढावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजनेसाठी १५ डिसेंबरपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार खरीप हंगाम-२०२६ व रब्बी हंगाम २०२६-२७ साठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू करण्यात आली असून बोगस किंवा फसवणुकीच्या उद्देशाने विमा उतरवल्यास संबंधित अर्जदारावर पाच वर्षांसाठी कृषी विभागाच्या योजनांच्या (उदा. नमो शेतकरी महासन्मान योजना) लाभावर बंदी घातली जाईल,असे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी १५ डिसेंबर २०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे आवाहन नागपूरच्या जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी डॉ.अर्चना कडू यांनी केले आहे. जिल्ह्यात ही योजना विमा क्षेत्र घटकानुसार राबवली जात असून, यासाठी 'युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड' या कंपनीची निवड करण्यात आली आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकरी ओळखपत्र क्रमांक अनिवार्य असून नुकसान भरपाई मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी डिजिटल पीक सर्वेक्षणांतर्गत पिकांची नोंद करणे बंधनकारक आहे.

नागपूर पदवीधर मतदारसंघातील अभिजित वंजारी यांच्या ऐतिहासिक विजयाचा मेडिकल चौकात जल्लोष



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार ॲड. अभिजित गोविंदराव वंजारी यांनी सलग दुसऱ्यांदा विजय संपादन केल्याबद्दल त्यांच्या ऐतिहासिक विजयाचा आनंदोत्सव व विजय जल्लोष आयोजित करण्यात आला.महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे महासचिव गिरीश कृष्णराव पांडव यांच्या पुढाकाराने हा विजय जल्लोष मेडिकल चौक, नागपूर येथील त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात आयोजित करण्यात आला असून या कार्यक्रमाला नवनिर्वाचित आमदार ॲड.अभिजित गोविंदराव वंजारी स्वतः उपस्थित होते.या विजय जल्लोषात काँग्रेस पक्षाचे आजी-माजी नगरसेवक, प्रदेश पदाधिकारी, युवक काँग्रेस, ठरवकचे पदाधिकारी व कार्यकर्ते, काँग्रेसचे विविध स्तरांवरील पदाधिकारी तसेच महाविकास आघाडीचे सहकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. पदवीधर मतदारांनी दाखविलेला विश्वास, कार्यकर्त्यांची मेहनत आणि महाविकास आघाडीच्या एकजुटीचे प्रतीक म्हणून या विजयाकडे पाहिले जात आहे. असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे महासचिव गिरीश कृष्णराव पांडव यांनी केले.

तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत संत भाकरे महाराज विद्यालयाचा डंका!

प्रिया बानाईत प्रथम, देवयानी बानाईत द्वितीय, तर परिधी बहे हिची तृतीय क्रमांकावर बाजी; प्रिया बानाईतची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड



विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देत त्यांच्यात आत्मविश्वास, विचारमांडणी आणि प्रभावी संवादकौशल्य विकसित करण्याच्या उद्देशाने पंचायत समिती नरखेडच्या वतीने आयोजित तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत मेंढला येथील श्री संत भाकरे महाराज विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी घवघवीत यश संपादन केले. या स्पर्धेत कु. प्रिया दिलीप बानाईत हिने प्रथम क्रमांक पटकावला, कु. देवयानी दिलीप बानाईत हिने द्वितीय क्रमांक मिळविला, तर कु. परिधी अमित बहे हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला. विशेष म्हणजे, प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या प्रिया बानाईत हिची जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेसाठी निवड झाल्याने विद्यालयाच्या शैक्षणिक व सांस्कृतिक यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

पंचायत समिती नरखेडच्या वतीने विद्यार्थ्यांच्या वक्तृत्वकौशल्याला प्रोत्साहन देण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत विविध वयोगटांतील विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळे विषय निश्चित करण्यात आले होते. इयत्ता पहिली ते पाचवीच्या गटासाठी पुस्तकांशी मैत्री, इयत्ता सहावी ते आठवीच्या गटासाठी शिवरायांकडून आजच्या पिढीने काय शिकावे, तर इयत्ता नववी ते दहावीच्या गटासाठी विविधतेत एकता भारताची खरी ताकद हे विषय देण्यात आले होते.

या विषयांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व, छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार व कार्य, तसेच राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक सलोखा यांसारख्या महत्त्वपूर्ण बाबींवर आपले विचार मांडण्याची संधी मिळाली. स्पर्धेत श्री संत भाकरे महाराज विद्यालय, मेंढला येथील विद्यार्थिनींनी विषयाचा सखोल अभ्यास, मुद्देसूद मांडणी, आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण आणि प्रभावी वक्तृत्वाच्या जोरावर परीक्षकांचे लक्ष वेधून घेतले.

इयत्ता पहिली ते पाचवीच्या गटात कु. प्रिया दिलीप बानाईत हिने आपल्या प्रभावी सादरीकरणातून प्रथम क्रमांक मिळविला. इयत्ता नववी ते दहावीच्या गटात कु. देवयानी दिलीप बानाईत हिने द्वितीय क्रमांक पटकावला, तर इयत्ता सहावी ते आठवीच्या गटात कु. परिधी अमित बहे हिने तृतीय क्रमांक मिळवून विद्यालयाच्या यशात भर घातली. तिन्ही विद्यार्थिनींनी मिळविलेल्या या यशामुळे मेंढला परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या स्पर्धेतील विशेष यश म्हणजे कु. प्रिया दिलीप बानाईत हिची जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेसाठी झालेली निवड होय. तालुकास्तरावर मिळविलेल्या यशानंतर आता जिल्हास्तरावरही आपल्या वक्तृत्वाची छाप पाडण्याची संधी तिला मिळणार आहे. तिच्या या निवडीमुळे विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, तिच्याकडून जिल्हास्तरावरही उल्लेखनीय कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

स्पर्धेतील विजेत्यांना पंचायत समिती नरखेडचे शिक्षण विस्तार अधिकारी श्री. भगत साहेब यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणाऱ्या अशा स्पर्धांचे महत्त्व अधोरेखित झाले. वक्तृत्व स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये केवळ भाषणकलेचाच विकास होत नाही, तर त्यांच्यात वाचनाची आवड, अभ्यासू वृत्ती, सामाजिक जाणीव, ऐतिहासिक दृष्टिकोन, राष्ट्रीय एकात्मतेची भावना आणि व्यासपीठावर निर्भीडपणे व्यक्त होण्याचे धैर्यही निर्माण होते.

या यशाबद्दल श्री संत भाकरे महाराज विद्यालयाच्या मुख्याध्यापकांनी, शिक्षकवृंदाने आणि शाळा परिवाराने तिन्ही यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. तसेच विद्यार्थिनींना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचेही कौतुक करण्यात आले. योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सराव आणि विद्यार्थिनींची मेहनत यांचा या यशात महत्त्वाचा वाटा असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

तालुकास्तरीय स्पर्धेतील या यशामुळे श्री संत भाकरे महाराज विद्यालय, मेंढला याचा नावलौकिक वाढला असून, प्रिया बानाईतच्या जिल्हास्तरीय निवडीमुळे विद्यालयाच्या पुढील यशाबाबत आशा उंचावल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला योग्य व्यासपीठ आणि प्रोत्साहन मिळाल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थीही मोठी झेप घेऊ शकतात, हे या यशातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

अभिजीत वंजारी यांच्या विजयाचा वाडीत जल्लोष!

ढोल-ताशांच्या गजरात भव्य विजय यात्रा; पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग



दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

नागपूर पदवीधर मतदारसंघातून अभिजीत वंजारी यांच्या विजयाच्या निमित्ताने गुरुवारी (दि. २९ ऑक्टोबर) वाडी शहरात भव्य विजय यात्रा काढून जल्लोष करण्यात आला. वंचित महाविकास आघाडीचे वाडी येथील गटनेते श्यामभाऊ मंडपे, उपगटनेते राजेशजी जंगले आणि नगरसेवक हर्षलजी काकडे यांच्या नेतृत्वाखाली या विजय यात्रेचे आयोजन करण्यात आले. विजय यात्रेची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी कार्यकर्त्यांनी विजयाच्या घोषणा देत आनंद व्यक्त केला. त्यानंतर मिठाईचे वाटप करण्यात आले. ढोल-ताशांच्या गजरात स्मारकापासून नगर परिषद, वाडीपर्यंत काढण्यात आलेल्या पायदळ विजय यात्रेत मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी झाले होते.

या विजय यात्रेत गटनेते श्यामभाऊ मंडपे, उपगटनेते राजेशजी जंगले, नगरसेवक हर्षलजी काकडे, प्रतोद आशिषजी पाटील, नगरसेवक राजेशजी थोराने, दिलीपजी दोरखंडे, पूवार्ताई काकडे, शीतलताई नंदागवळी, ॲकिताताई कापसे, सुनीताताई मेश्राम, ज्येष्ठ नगरसेवक नरेंद्रजी मेंढे, सामाजिक कार्यकर्ते शैलेश थोराने, अरुणजी कराळे, नागपूर जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अश्विन बैस यांच्यासह दुर्योधनजी ढोणे, प्रकाश कोकाटे, अनिलजी पाटील, मंगेश चोखान्द्रे, प्रेमाजी झाडे, दिनेशजी बनसोड, संजय जीवनकर, भीमराव लोखंडे, मधुजी मानके पाटील, चंद्रशेखरजी येवले, निता मडावी, अश्विन दुर्गे आणि साहिल चोखाद्रे यांच्यासह विविध क्षेत्रांतील पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ढोल-ताशांचा निनाद आणि कार्यकर्त्यांच्या घोषणांनी वाडी शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. अभिजीत वंजारी यांच्या विजयाचा आनंद व्यक्त करत ही विजय यात्रा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

देशात प्रथमच बॅटरीद्वारे १००० मेगावॅट वीजपुरवठा, महावितरणचे यश

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठीच्या सौरऊर्जा निर्मिती योजनेत निर्माण झालेली अतिरिक्त वीज तसेच ग्रीडद्वारे उपलब्ध स्वस्त सौरऊर्जा बॅटरीमध्ये साठवून सायंकाळी मोठ्या वीज मागणीच्या वेळी वापरण्यासाठी महावितरणने १००० मेगावॅट अवरचा टप्पा गाठला आहे. देशात प्रथमच विकेंद्रित स्वरुपात बॅटरीचा वापर करून इतका मोठ्या प्रमाणात वीज पुरवठा करण्यात येत असून राज्यातील परिस्थितीमुळे वाढलेल्या वीजमागणीच्या काळात हा वीजपुरवठा अत्यंत उपयुक्त ठरला आहे, अशी माहिती मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.

त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही गेमचेंजर योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत आतापर्यंत सुमारे ७ हजार मेगावॅट क्षमतेचे विकेंद्रित सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प सुरू झाले आहेत. या प्रकल्पांमधून निर्माण होणारी वीज कृषीपंपांना देण्यात येते. अतिरिक्त वीज बॅटरीमध्ये साठवून सायंकाळी कमाल वीज मागणीच्या वेळी देण्यासाठी महावितरणने सुरु केलेल्या बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टिम (बीईएसएस) योजनेत ५०० मेगावॅट क्षमतेची बॅटरी साठवणूक क्षमता नुकतीच कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यातून दोन तास वीजपुरवठा होणार असल्याने १००० मेगावॅट अवर इतकी बीईएसएस क्षमता उपलब्ध झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार सुरू झालेल्या बॅटरी स्टोरेज योजनेतून सर्वच वीजग्राहकांना लाभ होत आहे.

एल निनोच्या प्रभावामुळे पाऊस कमी झाला असून त्यामुळे ऑक्टोबर महिन्यात उष्णतेच्या झळा अधिक जाणवत आहेत. परिणामी विजेची उच्चांकी मागणी होत आहे. सौरऊर्जेमुळे दिवसा पुरेसा व किफायतशीर दरात वीजपुरवठा होत आहे. सायंकाळी सौरऊर्जेचा पुरवठा बंद झाल्यानंतर वीज पुरवठा करण्यासाठी अधिक दराने वीज विकत घ्यावी लागते. अशा स्थितीत महावितरणच्या पुढाकाराने सुरू झालेल्या १००० मेगावॅट अवर क्षमतेच्या बॅटरी स्टोरेज प्रकल्पामुळे दिलासा मिळू लागला आहे.

महावितरणने एकूण ७५० मेगावॅट क्षमतेचे बॅटरी साठवणूक प्रकल्प उभारण्याची योजना सुरू केली असून त्यातून दोन तासांसाठी प्रत्येकी ७५० मेगावॅट अर्थात एकूण १५०० मेगावॅट अवर वीज उपलब्ध होईल. त्यापैकी १००० मेगावॅट अवरचे काम पूर्ण झाले आहे. ऊर्वरित काम डिसेंबरअखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे. याखेरीज ४००० मेगावॅट अवर क्षमतेचे प्रकल्प उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे. या प्रकल्पामुळे सायंकाळी उच्चांकी मागणीच्या वेळी हमखास वीज उपलब्ध होणे आणि बाजारभावाच्या तुलनेत अत्यंत किफायतशीर दरात उपलब्धता असे दोन लाभ आहेत. आगामी उन्हाळ्यात या योजनेचा सर्वाधिक लाभ होईल.

देशातील पहिली वीज कंपनी

देशातील वीज वितरण कंपन्यांमध्ये १००० मेगावॅट अवर इतक्या क्षमतेचे विकेंद्रित वितरण जाळ्यावाशी संलग्न असलेले बॅटरी स्टोरेज प्रकल्प सुरू करणारी महावितरण ही पहिली वीज वितरण कंपनी आहे. राज्यात एकूण ५० ठिकाणी प्रत्येकी १० मेगावॅट क्षमतेचे बॅटरी स्टोरेज प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टिम हा नवीकरण ऊर्जा (रिन्युएबल एनर्जी) क्षेत्रातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. त्याद्वारे नवीकरणीय ऊर्जेचा वापर करून तयार झालेली वीज साठविणे आणि ती वीज सर्वाधिक मागणीच्या वेळी वापरणे शक्य झाले आहे.

थोडक्यात

अभिजीत वंजारी यांच्या विजयाचा आनंद, मिठाई वाटप आणि फटाक्यांची आतषबाजी



दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

नागपूर पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीची मतमोजणी पूर्ण होताच काँग्रेसचे उमेदवार अभिजीत वंजारी विजयी घोषित झाले आणि काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे व आनंदाचे वातावरण पसरले. अभिजीत वंजारी यांच्या विजयाची बातमी मिळताच, शहर काँग्रेस समितीचे अध्यक्ष पवन जैस्वाल, मनोज बसवर, माजी नगरसेवक सुनील चाफेकर, युवक काँग्रेस सावनेर कळमेश्वर विधानसभा क्षेत्र अध्यक्ष, अध्यक्ष राजेश खंगारे यांच्या नेतृत्वाखाली शेकडो कार्यकर्ते शहरातील गांधी चौकात जमले. त्यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून, उपस्थितांना मिठाई वाटून आणि फटाके फोडून आपला आनंद व्यक्त केला आणि या विजयाला परिवर्तनाची नादी म्हटले जात आहे.

याप्रसंगी, माजी नगरसेवक दीपक बसवार, शफीक सय्यद, प्रा.साहेबराव उपस्थित होते. विरखरे, ज्येष्ठ शिक्षक शंकर आगलावे, प्रा.योगेश पाटील, रमेश घटे, अरुण कळंबे, शाहरुख शेख, प्रा.विजय टेकाडे, स्वप्नील महाजन, मनीस बारस्कर, राहुल धोंगडे, शेकडो कामगार उपस्थित होते.

हसारा येथे अवैध रेती साठा व मिनी ट्रक जप्त, तुमसर पोलिसांची धडक कारवाई

दहा लाख सहा हजार रुपयांचा अवैध रेतीसाठा व मिनी ट्रक जप्त



दै. सिंहवाणी वृत्त, तुमसर

पोलीस स्टेशन तुमसर अंतर्गत येणाऱ्या हसारा परिसरात गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी केलेल्या धडक कारवाईत अवैध रित्या रेतीची वाहतूक करणारा अशोक लेलँड कंपनीचा मिनी ट्रक क्रमांक MH 35-AJ-5659 आणि १ ब्रास रेती असा एकूण १०,०६,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. चालक प्रतीक संजय कुंभरे वय २४, राहणार सुंदरटोला हा विनापरवाना रेतीची वाहतूक करताना रंगेहाथ पकडला गेला असून, या प्रकरणी चालक आणि ट्रक मालक सचिन मदनलाल येरणे राहणार गोबरवाही यांच्याविरुद्ध पोलीस शिपाई तिलक चौधरी यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक सुभाष बारसे यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक मनोहर सहारे करीत आहेत.

जि. प. हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय कोदामेंढी येथील रिक्त पदे भरण्यासाठी भगवान बावनकुळे यांच्या नेतृत्वात शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

जि.प माध्यमिक, उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय कोदामेंढी येथे गेल्या अनेक वर्षापासून शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पदे रिक्त आहेत. त्याकरिता बुधवार (ता. २८ ऑक्टोबर) ला शिक्षणाधिकारी प्राथमिक जिल्हा परिषद नागपूर यांना पवित्र पोर्टल द्वारे समुपदेशनाद्वारे येणाऱ्या नवीन शिक्षकांना जिल्हा परिषद माध्यमिक शाळा कोदामेढी येथे इयत्ता पाचवी करिता शिक्षक देण्यासह इतरही वर्गातील व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्यासाठी भाजपा तालुका मौदा मंडळ अध्यक्ष भगवान बावनकुळे यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले. जिल्हा परिषद माध्यमिक शाळा कोदामेंढी, पाचगाव, पारडसिंगा येथे संच मान्यता मान्य पदानुसार शिक्षक देण्यात यावे, अशीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

याप्रसंगी भाजपा तालुका मौदा मंडळ अध्यक्ष भगवान बावनकुळे, भारतीय जनता युवा मोर्चा तालुका मौदा प्रभारी तथा जिल्हा उपाध्यक्ष वीरेंद्र पायतोडे, उपसरपंच गोपाल गिरमेकर, भारतीय जनता युवा मोर्चा तालुका उपाध्यक्ष प्रणय भुतांगे आणि गावातील प्रतिष्ठित नागरिक तसेच जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सुधीर गवारकर, सचिव विनोद नाकाडे, कोषाध्यक्ष संदीप गिरडकर उपस्थित होते. यावेळी शिक्षणाधिकारी यांनी येणाऱ्या समोरील समुपदेशनामध्ये आपल्या शाळेमध्ये शिक्षक मान्य पदांनुसार शिक्षक देण्यात येईल असे आश्वासित केले आहे.

शामराव धापोडकर यांचे निधन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर



४९, स्वराज नगर ओमकार नगर मानेवाडा रिंग रोड नागपूर येथील रहिवासी शामराव धापोडकर यांचे २८ तारखेला निधन झाले. मृत्युसमयी ते ८५ वर्षाचे होते. मानेवाडा घाटावर अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात बराच मोठा परिवार आहे.

राष्ट्रीय एकतेचा संदेश देणारी 'युनिटी मॅरेथॉन रन'

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

देशाचे पहिले गृहमंत्री, उप पंतप्रधान, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त नागपूर महानगरपालिकेच्यावतीने युनिटी रन मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन शनिवार, ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजता सरदार वल्लभभाई पटेल मैदान (कच्छीविसा), लकडगंज येथून करण्यात आले आहे. शहरातील नागरिकांमध्ये राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव आणि सामाजिक ऐक्याची भावना दृढ करण्याच्या उद्देशाने मनपाद्वारे युनिटी मॅरेथॉन रन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

नागरिकांच्या या स्पर्धेतील सहभागातून राष्ट्रीय एकतेचा संदेश देणे हा यामागील उद्देश असून, मोठ्या संख्येने नागरिकांनी स्पर्धेत सहभाग नोंदवावा, तसेच राष्ट्रीय एकतेच्या कार्यात सहभागी व्हावे असे आवाहन महापौर निता ठाकरे यांनी केले आहे.

युनिटी रन मॅरेथॉन स्पर्धेत २१. कि.मी.(खुला), १० कि.मी. पुरुष व महिला खुला गट, ५.३ कि.मी. महिला खुला गट, ५.३ कि.मी. १६ वर्षाखालील मुले, २.५ कि.मी. १६ वर्षाखालील मुली तसेच सर्वांसाठी २.३ कि.मी. ची असणार आहे. विशेष म्हणजे, स्पर्धेतील सहभागी धावपटूंना प्रोत्साहन देण्यासाठी आकर्षक पारितोषिके प्रदान केली जाणार आहेत. यात एकूण ११ लाख रुपयांची पारितोषिके देण्यात येणार असून, वेशभूषा स्पर्धा (फॅन्सी ड्रेस) सहभागींसाठी आकर्षक बक्षिसे, प्रथम ५ हजार धावपटूंना पदके आणि सर्व नोंदणीकृत धावपटूंना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

राष्ट्रीय एकता दिवसाच्या निमित्ताने आयोजित या युनिटी मॅरेथॉनमध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. धावण्याच्या माध्यमातून आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देतानाच राष्ट्रीय एकता, बंधुभाव आणि सामाजिक ऐक्याची भावना अधिक दृढ करण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा. कुटुंबीय, मित्रमंडळी तसेच विविध संस्था व संघटनांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून युनिटी मॅरेथॉनला यशस्वी करावे, असे आवाहन सत्तापक्ष नेते तथा कार्यक्रमाचे संयोजक नरेंद्र (बाल्या) बोरकर केले आहे.

युनिटी मॅरेथॉन रन स्पर्धेला महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी उपस्थित राहणार असून, त्यांच्या शुभहस्ते हिरवी झेंडी दाखवून मॅरेथॉनला सुरुवात करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर निता ठाकरे राहणार असून, या कार्यक्रमाला केंद्रीय युवक कल्याण व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, विशेष अतिथी म्हणून राज्याचे महसूल मंत्री तथा नागपूरचे पालकमंत्री, श्री. चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री आशिष जैस्वाल, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, राज्यसभा सदस्य माया इवनाते, विधान परिषद आमदार सर्वश्री अभिजीत वंजारी, सुधाकर अडबाले, डॉ. परिणय फुके, कृपाल तुमाने, संजय भेंडे, डॉ. राजीव पोतदार, विधान सभा सदस्य आमदार सर्वश्री. डॉ. नितीन राऊत, कृष्णा खोपडे, प्रवीण दटके, मोहन मते, विकास ठाकरे, यांची उपस्थिती राहणार आहेत.

तसेच विशेष मान्यवर म्हणून, उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे, सत्तापक्ष नेते तथा युनिटी मॅरेथॉन रनचे संयोजक नरेंद्र (बाल्या) बोरकर, विरोधी पक्ष नेते संजय महाकाळकर, मनपा आयुक्त डॉ. विपीन, अतिरिक्त आयुक्त अंकित, अतिरिक्त आयुक्त मुरुगानंथम एम., अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, क्रीडा विशेष समिती सभापती दर्शनी धवड, शिक्षण विशेष समिती सभापती श्रीमती संतोष लड्ढा, लकडगंज झोन सभापती महेश्वरी बिसेन, एआयएमआयएमचे गटनेता शकील पटेल, इंडिअन मुस्लिम लीगचे गटनेता असलम खान मुल्ला, शिवसेना(उबाठा)चे गटनेता श्री. किशोर कुमेरिया, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) गटनेता आभा पांडे, बहुजन समाज पार्टीच्या गटनेता हर्षला जैस्वाल, शिवसेनाचे गटनेता गणेश चार्लेवार, स्थानिक नगरसेवक बालू लारोकर, नगरसेविका अर्चना पडोळे, नगरसेवक अतुल कोटेचा यांची उपस्थिती राहणार आहे.

संकेतस्थळाच्या माध्यमातून नोंदणी

नागपूर महानगरपालिकेच्या वतीने 'युनिटी मॅरेथॉन' मध्ये सहभागी सर्व खेळाडू आणि नागरिकांसाठी एक संकेतस्थळ तयार करण्यात आले आहे, या संकेत स्थळाच्या मदतीने मोठ्या संख्येत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला असल्याची माहिती उपायुक्त मंगेश खवले व क्रीडा अधिकारी डॉ.पियुष अंबुलकर यांनी दिली.

११ लाख रुपयांची पारितोषिके

युनिटी मॅरेथॉन रन मध्ये विजयी होणाऱ्या खेळाडूंसाठी एकूण ११ लाख रुपयांची पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. विविध वयोगटांनुसार ही पारितोषिके विभागण्यात आली असून, प्रत्येक गटातील पहिल्या दहा क्रमांकाच्या धावपटूंना पदक, प्रमाणपत्र आणि रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. तसेच मॅरेथॉनमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व खेळाडू व नागरिकांना सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

१६ वर्षाखालील मुली - श.२.५ कि.मी.

या गटातील मॅरेथॉनची सुरुवात कच्छीविसा मैदान येथून होऊन सतनामी नगर चौकापासून उजवीकडे मार्गक्रमण करत आंबेडकर चौक, वर्धमान नगर, एम.एस.ई.बी. ऑफिस, सुदर्शन चौक, हरिहर मंदिर, लकडगंज पोलीस स्टेशन, सतरंजीपूरा, क्वेटा कॉलोनी, टेलिफोन एक्सचेंज चौक, छापरूनगर चौक, आंबेडकर चौक, सतनामी नगरमार्गे कच्छीविसा मैदान येथे समाप्ती होईल.

पारितोषिके: प्रथम पुरस्कार रुपये १५,०००/-, द्वितीय पुरस्कार रुपये ११,०००/-, तृतीय पुरस्कार रुपये ९,०००/-, चौथ्या क्रमांकासाठी ७,०००/-, पाचव्या, सहाव्या, सातव्या, आठव्या, नवव्या आणि दहाव्या क्रमांकावरील खेळाडूंना ५,०००/- रुपयांचे पुरस्कार मिळणार आहेत.

१६ वर्षाखालील मुले - ५.३ कि.मी.

या गटाची सुरुवात कच्छीविसा मैदान येथून होऊन सतनामी नगर चौकापासून उजवीकडे मार्गक्रमण करत आंबेडकर चौक, वर्धमान नगर, एम.एस.ई.बी. ऑफिस, सुदर्शन चौक करत पुन्हा सतनामी नगरमार्गे कच्छीविसा मैदान येथे समाप्ती होईल.

पारितोषिके : प्रथम पुरस्कार रुपये १५,०००/-, द्वितीय पुरस्कार रुपये ११,०००/-, तृतीय पुरस्कार रुपये ९,०००/-, चौथ्या क्रमांकासाठी ७,०००/-, पाचव्या, सहाव्या, सातव्या, आठव्या, नवव्या आणि दहाव्या क्रमांकावरील खेळाडूंना ५,०००/- रुपयांचे पुरस्कार मिळणार आहेत.

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : महाराष्ट्र शासनाच्या कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजने अंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील दारिद्रिरेषेखालील भूमिहीन कुटुंबांना चार एकर कोरडवाहू किंवा दोन एकर बागायती शेतजमीन १००टक्के अनुदान तत्त्वावर उपलब्ध करून देण्यात येते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन समाज कल्याण विभागाच्या सहायक आयुक्त सुकेशनी तेलगोटे यांनी केले आहे. योजनेच्या लाभासाठी अर्जदार अनुसूचित जाती किंवा नवबौद्ध घटकातील, दारिद्रिरेषेखालील किंवा अंत्योदय शिधापत्रिकाधारक भूमिहीन शेतमजूर असावा. दारिद्रिरेषेखालील विधवा, परित्यक्ता व घटस्फोटीत स्त्रिया तसेच अनुसूचित जाती / जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत अत्याचारग्रस्त व्यक्ती किंवा कुटुंब तसेच तृतीयपंथी व्यक्ती या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करू शकतात. या योजनेचा लाभ घेण्यासाठी सहायक आयुक्त, समाज कल्याण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नागपूर येथील कार्यालयातून अर्ज प्राप्त करावे. योजनेबाबत अधिक माहितीसाठी समाज कल्याण कार्यालयाशी संपर्क साधावा,असे कळविण्यात आले आहे.

"आजच्या पिढीचे ज्ञान प्रगल्भ आहे बसं मेहनतीचे सातत्य हवे..!" : विशाल देवतळे

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

जिल्हा परिषद नागपूर व्दारा आयोजित " माझा आवाज" आंतरशालेय तालुकास्तरीय वकृत्व स्पर्धा हिंगणा तालुका शिक्षण विभागा व्दारा आज दिनांक २८ ऑक्टोबर २०२६ ला जिल्हा परिषद शाळा सुकळी गुपचूप येथे 'वर्ग ३ ते ५' , वर्ग ६ ते ८ आणि वर्ग ९ ते १० अशा तीन गटात जिल्हा परिषद व खाजगी अनुदानित विनाअनुदानित शाळा निहाय वेगवेगळ्या विषयांवर घेण्यात आली. अर्ज या स्पर्धेत जिल्हा परिषद शाळेच्या आणि खाजगी अनुदानित विनाअनुदानित शाळांच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

तालुकास्तरीय वकृत्व स्पर्धेप्रसंगी विशाल देवतळे सुप्रसिद्ध कादंबरीकार मुख्य परिक्षक व अध्यक्षस्थानी



उपस्थित होते. तसेच या स्पर्धेचे परिक्षक म्हणून वंदना देशपांडे सेवानिवृत्ती मुख्याध्यापिका व विजया दहिकर सेवानिवृत्त मुख्याध्यापिका उपस्थित होते. तसेच हिंगणा तालुका शिक्षणाधिकारी भागवत सांगोळे गट शिक्षणाधिकारी हिंगणा, सुनील चरपेसर, ज्योत्स्ना हरडे ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी व चंद्रप्रभा शोभणे शिक्षण विस्तार अधिकारी हिंगणा तालुका प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

"आजची ही पिढी खूप प्रगल्भ पिढी आहे. आपल्या मेहनतीचे व सरावाचे सातत्य ठेवले तर यशाच्या वाटा सहजच फुलून आणणारी आहे. बालकांच्या सर्वांगीण विकासासोबतच बौद्धिक, वकृत्व विकासासाठी शिक्षकांनी बालकांना अगत्याने प्रोत्साहित केले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या वकृत्वातून खूप काही अनुभवायला अन् शिकायला मिळाले...." असे भावोद्गार सुप्रसिद्ध कादंबरीकार व स्पर्धेचे अध्यक्ष विशाल देवतळे यांनी व्यक्त केले.

हिंगणा तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा व खाजगी अनुदानित विनाअनुदानित शाळांनी मोठ्या प्रमाणात शालेय व केंद्र स्तरांवरील विजेत्या मुलांना स्पर्धेसाठी सहभागी केले ज्यातून गटनिहाय विजेते विद्यार्थी पुढे जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरली.

विजेत्या विद्यार्थाचे सन्मानचिन्ह प्रमाणपत्र व पुचछगुच्छांनी कौतुक करण्यात आले व पुढील वाटचालीसाठी तालुक्याच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या. या स्पर्धेचे आयोजन शिक्षण विभाग पंचायत समिती हिंगणाच्या वतीने करण्यात आले. या स्पर्धेचे सूत्रसंचालन जितेंद्र चामाटे यांनी केले. प्रास्ताविक चंद्रभान शोभणे शिक्षण विस्तार अधिकारी यांनी केले तर स्पर्धेचे आभार प्रदर्शन मेश्राम सर यांनी केले.प्रत्यक्ष अप्रत्यक्ष शिक्षण विभागातील सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी या स्पर्धेसाठी मोलाचे सहकार्य करुन स्पर्धा यशस्वी केली.

नागेश शेवाळकर यांच्या दोन पुस्तकांना पुरस्कार!

दै. सिंहवाणी वृत्त, पुणे



येथील मातृमंदिर विश्वस्त संस्था, पुणे यांच्यावतीने दरवर्षी संत साहित्याला पुरस्कार प्रदान करण्यात येत असतात. यावर्षीचे पुरस्कार संस्थेचे कार्यवाह वाचस्पती वा.म.देवळेकर यांनी नुकतेच जाहीर केले आहेत. त्यानुसार 'विशेष पुरस्कार' अंतर्गत नागेश शेवाळकर लिखित प.पू.पुणानंद महाराज समर्थ या ग्रंथासाठी जाहीर झाला आहे. नागेश शेवाळकर लिखित आणि लाडोबा प्रकाशन, पुणे यांनी प्रकाशित केलेल्या 'पवनपुत्र हनुमान' या पुस्तकाची निवड 'संत साहित्य ललित विभाग' या अंतर्गत झाली असल्याचे कार्यवाह वाचस्पती वा.म. देवळेकर यांनी जाहीर केले आहे. विशेष म्हणजे 'पवनपुत्र हनुमान' हे पुस्तक प्रकाशक घनश्याम पाटील यांनी 'लाडोबा' प्रकाशनाच्यावतीने अत्यंत देखण्या स्वरूपात प्रकाशित केले आहे. प्रकाशक म्हणून घनश्याम पाटील यांनाही संस्थेच्यावतीने पुरस्कार जाहीर केला आहे. महत्त्वाचे म्हणजे गत अठ्ठावीस वर्षांपासून मातृमंदिर विश्वस्त संस्था या पुरस्कारांचे आयोजन आणि वितरण करीत असल्याचे देवळेकर यांनी सांगितले.

सदर पुरस्कार २२ नोव्हेंबर २०२६ रोजी मनोहर सभागृह, ज्ञानप्रबोधिनी विद्यालय निगडी पुणे येथे विजय कुवळेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहेत. पुरस्कारांसाठी पुस्तकांची निवड आणि परीक्षण डॉ. सुनितीताई सहस्त्रबुद्धे तसेच डॉ. भालचंद्र कापरेकर यांनी केली आहे. संस्थेच्यावतीने सु.मा.कुलकर्णी यांनी ही बातमी भ्रमणध्वनीवर कळवली. याप्रसंगी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना नागेश शेवाळकर म्हणाले, हे दोन्ही पुरस्कार माझ्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असून पवनपुत्र हनुमान आणि प.पू. पुणानंद महाराज यांचा आशीर्वाद नि प्रसाद म्हणून मोठ्या भक्तिभावाने स्वीकारणार आहे. दोन्ही पुस्तकांच्या संहिता देवकृपेने माझ्या हातून लिहून झाल्या. प्रकाशक घनश्यामजी पाटील, ज्योतीताई घनश्याम, श्याम महाराज वारंगकर, सुरेंद्र गोगटे व स्नेहाताई गोगटे तसेच दिलीप कस्तुरे यांचे शतशः आभार मानतो. प.पू.पुणानंद महाराज या ग्रंथाला प.पू. गोविंद गिरी महाराज यांची आशीर्वादपर प्रस्तावना लाभली आहे. नागेश शेवाळकर यांचे नातेवार्इक, परिचित, मित्रपरिवार, संपादक -प्रकाशक, लेखक, वाचक अशा विविध स्तरांवर अभिनंदन होत आहे.

लाकूड चोरट्याचा वनमजुरावर कुऱ्हाडीने हल्ला!

दोन्ही हातांवर कुऱ्हाडीचे घाव; गंभीर जखमी वनमजुराला नागपूरच्या मेडिकलमध्ये हलविले, एका तासात आरोपी पोलिसांच्या ताब्यात

दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

जंगलातून सागवानाचे लाकूड घेऊन जाणाऱ्या व्यक्तीला थांबवून विचारणा करणे आणि छायाचित्र काढणे वनमजुराच्या जीवावर बेतल्याची धक्कादायक घटना रामटेक तालुक्यातील सत्रापूर शिवारात घडली. संतप्त झालेल्या संबंधित व्यक्तीने वनमजूर एकनाथ भोयर यांच्यावर कुऱ्हाडीने हल्ला केल्याचा आरोप आहे. या हल्ल्यात भोयर यांच्या दोन्ही हातांवर कुऱ्हाडीचे घाव लागल्याने ते गंभीर जखमी झाले. त्यांना प्रथम रामटेक येथील उपजिल्हा रुग्णालयात



दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारांनंतर पुढील उपचारासाठी नागपूर येथील मेडिकल रुग्णालयात हलविण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान, घटनेनंतर अवघ्या एका तासात पोलिसांनी संशयित आरोपीला ताब्यात घेतले.

मिळालेल्या माहितीनुसार, बुधवार, २८ ऑक्टोबर रोजी पहाटेच्या सुमारास रामटेक तालुक्यातील सत्रापूर शिवारात ही घटना घडली. बोरडा येथील रहिवासी प्रकाश जयपत परतेती हे सायकलवरून सागवानाचे लाकूड घेऊन जात असल्याचे वनमजूर एकनाथ भोयर यांच्या निदर्शनास आले. यावेळी भोयर यांनी त्यांना थांबवून लाकूड कुठून आणले, अशी विचारणा केली. तसेच या घटनेचे छायाचित्र काढत असताना संबंधित व्यक्ती संतप्त झाली. त्यानंतर त्याने भोयर यांच्यावर कुऱ्हाडीने हल्ला केल्याची माहिती आहे.

अचानक झालेल्या हल्ल्यापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी एकनाथ भोयर यांनी दोन्ही हात वर केले. मात्र, यावेळी त्यांच्या दोन्ही हातांवर कुऱ्हाडीचे घाव लागले. यात ते गंभीर जखमी झाले. घटनेनंतर त्यांना तातडीने रामटेक येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर प्रकृतीची गंभीरता लक्षात घेऊन पुढील उपचारासाठी नागपूर येथील मेडिकल रुग्णालयात हलविण्यात आले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

वनविभाग आणि पोलिसांची तातडीने कारवाई

घटनेची माहिती मिळताच रामटेकचे वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल शिदि घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान, पारशिवणी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक डोणेकर, पोलीस हवालदार संदीप नागोसे आणि हरीश यंगलवार यांनी गावकऱ्यांच्या मदतीने कारवाई केली. पोलिसांनी घटनेच्या एका तासाच्या आत आरोपीला ताब्यात घेतले. त्याच्याकडून हल्ल्यासाठी वापरल्याची कुऱ्हाड आणि सायकल जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पारशिवणी पोलीस आणि वनविभागाकडून करण्यात येत आहे.

वनकर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

वनसंपत्तीचे संरक्षण करण्याची जबाबदारी पार पाडणाऱ्या वनमजुरावरच कुऱ्हाडीने हल्ला झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. जंगलातील अवैध वृक्षतोड आणि लाकूड वाहतूक रोखण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या वनकर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न या घटनेमुळे पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

थोडक्यात

कर्करोग संशोधनासाठी प्रा. अभिषेक गर्ग यांना स्वित्झर्लंडचा प्रतिष्ठित 'स्विस ब्रिज पुरस्कार २०२६' प्रदान

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

प्रा. अभिषेक दिनकरनाथ गर्ग यांना २९ ऑक्टोबर २०२६ रोजी झुरिच, स्वित्झर्लंड येथे आयोजित समारंभात प्रतिष्ठित 'स्विस ब्रिज पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. कर्करोग संशोधनाच्या



क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना हा सन्मान देण्यात आला. इम्युनो-ऑन्कोलॉजी, पेशी मृत्यूविषयक प्रतिकारशास्त्र, आण्विक ताण-प्रतिक्रिया, कर्करोगविरोधी लसी, ट्यूमरच्या सूक्ष्मपरिसरावरील संशोधन, बायोमार्करचा शोध, स्पॅशियल बायोलॉजी तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित ट्रान्सलेशनल ऑन्कोलॉजी या क्षेत्रांतील त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाची या पुरस्काराद्वारे दखल घेण्यात आली आहे.

प्रा. गर्ग यांना कर्करोग प्रतिकारशास्त्र आणि इम्युनो-ऑन्कोलॉजी या क्षेत्रांत १७ वर्षांहून अधिक अनुभव आहे. सध्या ते बेल्जियममधील केयू ल्यूवेन विद्यापीठाच्या वैद्यकीय विद्याशाखेतील सेलुलर अँड मॉलिक्युलर मेडिसिन विभागात रिसर्च असोसिएट प्रोफेसर आणि ग्रुप लीडर म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या संशोधन कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली असून, त्यांना अनेक प्रतिष्ठित पुरस्कार मिळाले आहेत. यामध्ये शिक्षण, विज्ञान आणि नवोपक्रम या क्षेत्रांतील २०२६ चा इंडिया-यूके अचिव्हर्स ऑनर, २०२५ चा ॲस्ट्राझेनेका फाउंडेशन पुरस्कार आणि २०२३ मध्ये मिळालेला बेल्जियमचा ४१ वा प्रिक्स गॅलेन पुरस्कार यांचा समावेश आहे. याशिवाय त्यांना इतर अनेक प्रतिष्ठित शैक्षणिक आणि वैज्ञानिक पुरस्कारही प्राप्त झाले आहेत.

धानला केंद्रस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत पिपरीच्या तनुष्का चरडे व दहेगावच्या स्वरा हटवार प्रथम



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

जि.प. उच्च प्राथमिक शाळा, धानला येथे सोमवार (ता.२६ ऑक्टोबर) ला झालेल्या धानला केंद्रस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत चुरस पाहायला मिळाली. या स्पर्धेचा निकाल : गट १ (इयत्ता ३ ते ५) - प्रथम क्रमांक - कु. तनीष्का चरडे (जि.प. शाळा पिपरी) गट २ (इयत्ता ६ ते ८) - प्रथम क्रमांक - कु. स्वरा विजय हटवार (पीएम श्री जि.प. उच्च प्राथ. शाळा दहेगाव) दोन्ही विजेत्या विद्यार्थिनींची तालुकास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या स्पर्धेत 'माझा आवाज या उपक्रमातंर्गत...' विविध गटानुसार वेगवेगळ्या विषयावर विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रप्रमुख राजू आंबीलकर होते.प्रमुख पाहुणे शाळा व्यवस्थापन समिती सदस्य धानला नारायण मेश्राम, मुख्याध्यापक वासुदेव भुते पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दहेगाव , मुख्याध्यापक गजानन बेले जि. प. उच्च प्राथमिक शाळा पिपरी, मुख्याध्यापक कवडू शेंडे प्राथमिक शाळा सुंदरगाव उपस्थित होते. संचालन शिक्षिका वनिता दंडारे यांनी केले. यावेळी सर्व केंद्रातील शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी धानला केंद्रातील सर्व शिक्षकवृंदाने परिश्रम घेतले. दोन्ही विद्यार्थिनींचे मुख्याध्यापक व केंद्रप्रमुखांनी अभिनंदन केले.आभार प्रदर्शन शिक्षिका रंजना बोरकर यांनी केले.

सालेकसा वनपरिक्षेत्रात चितळाच्या शिकारीचा पर्दाफाश, कातडी व मांस जप्त

पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल, दोघे फरार असल्याची माहिती



दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा / गोंदिया

गोंदिया वनविभागांतर्गत सालेकसा वनपरिक्षेत्रातील बाकलसर्रा शिवारात चितळाची बेकायदेशीर शिकार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. २८ ऑक्टोबर २०२६ रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे वनविभागाच्या पथकाने कारवाई करत चितळाची ताजी टिपेकदार कातडी व मांस जप्त केले. जंगलात विद्युत प्रवाह सोडून चितळाची शिकार केल्याचा संशय असून, घटनास्थळी पंचनामा करून मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला. जप्त कातडी व मांसाचे नमुने तपासणीसाठी पाठविण्याची प्रक्रिया सुरू आहे. या प्रकरणी वन्यजीव (संरक्षण) कायदा, १९७२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

या प्रकरणात नरेंद्र श्रीराम चौडाये (वय २६), दिनेश भरतलाल मेश्राम (वय २६), राजू भागचंद उईके (वय ३०), भरतलाल किसनलाल मेश्राम (वय ६०) आणि कृष्णा बिसराम चौडाये (वय ५५) यांची नावे आरोपी म्हणून नमूद करण्यात आली आहेत. यापैकी दोन आरोपी फरार असल्याची माहिती वनविभागाने दिली आहे. उपवनसंरक्षक पवन कुमार जोग व सहाय्यक वनसंरक्षक सचिन डोंगरवार यांच्या मार्गदर्शनाखाली, सालेकसा वनपरिक्षेत्र अधिकारी अतुल वाळके यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली. पथकात क्षेत्र सहाय्यक जे. जी. खान, चौव्हान, प्रदीप भंडारकर, किशोर फुंडे, विनोद भेंडारकर, पाऊलझगडे, सुलाखे, सुनील बारसे तसेच इतर वनरक्षक व वनकर्मचाऱ्यांचा समावेश होता.

रब्बी हंगामात कमी पाण्यावरील पिकांना प्राधान्य द्यावे : राज्यमंत्री जयस्वाल

महाडीबीटीवर शेतकऱ्यांची १०० टक्के नोंदणी करण्यासाठी मिशन मोडवर काम करण्याचे प्रशासनाला निर्देश

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

जिल्ह्यातील पावसाची स्थिती आणि पाणीटंचाई लक्षात घेता आगामी रब्बी हंगामात शेतकऱ्यांनी गव्हाऐवजी हरभरा, ज्वारी, मोहरी आणि मसूर यांसारख्या कमी पाण्यावर व १०० दिवसांत येणाऱ्या पिकांची लागवड करावी, असे आवाहन राज्याचे कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी केले आहे.

नागपूर जिल्ह्यातील खरीप पीक परिस्थिती, रब्बी हंगाम पूर्वतयारी, चारा नियोजन आणि बचत गट सक्षमीकरण आदी विषयांचा राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी आज रवी भवन येथे आढावा घेतला.

बैठकीस विभागीय कृषी सहसंचालक उमेश घाटगे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी डॉ. अर्चना कडू, पशुसंवर्धन विभागाचे श्री. फुके, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. गुल्हाने यांच्यासह कृषी व पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यातील एकही शेतकरी शासकीय योजनांपासून वंचित राहू नये, यासाठी कृषी विभागाने गावपातळीवर विशेष मोहीम राबवून १०० टक्के शेतकऱ्यांचे अर्ज 'महाडीबीटी' पोर्टलवर अपलोड करण्याचे निर्देश जयस्वाल त्यांनी प्रशासनाला दिले.

कमी पाणी लागणारे पीक घेण्याचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावे

नागपूर जिल्ह्यात यंदा सरासरीच्या ६४ टक्के म्हणजेच ५७२ मि.मी. पाऊस झाला असून, पावसाच्या खंडामुळे व उशिरा झालेल्या रोवणीमुळे सिंचन सुविधा



नसलेल्या भागातील धान पिकाचे नुकसान झाले आहे. जिल्ह्यात बाधित शेतकऱ्यांना पीक विमा व नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी पीक कापणी प्रयोगाचे काम तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना राज्यमंत्र्यांनी दिल्या. फेब्रुवारी महिन्यात संभाव्य तापमान वाढ व पाण्याची उपलब्धता लक्षात घेता, पाटबंधारे विभागाशी समन्वय साधून कालव्याद्वारे ज्वारी व हरभरा पिकांना मर्यादित पाणी सोडण्याचे वेळापत्रक निश्चित करावे, तसेच कृषी विभागाने कमी पाण्यावरील पिकांचे अर्थशास्त्र व तंत्रज्ञान समाज माध्यमे आणि माहितीपत्रकांद्वारे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावे, असे निर्देश त्यांनी दिले.

चारा टंचाईच्या समस्येवर उपाय योजना; पूर्वतयारीला प्राधान्य

पशुसंवर्धन विभागाच्या आढाव्यात २१ व्या पशुगणनेनुसार नागपूर जिल्ह्यात एकूण लहान व मोठे ६,७७,१४० पशुधन असल्याचे नमूद करण्यात आले. जिल्ह्यात खरीप हंगाम पेरणीनुसार २५२ दिवस पुरेल एवढा चारा उपलब्ध असून, खरीप हंगामाकरिता १०० लक्ष रुपयांचे वैरण बियाणे ५,१५३ पशुपालकांना १०० टक्के अनुदानावर वाटप करण्यात आले आहे. भविष्यात चारा टंचाई उद्भवू नये यासाठी पूर्व नियोजन म्हणून जिल्हा नियोजन समितीद्वारे ३०० लक्ष निधीचे वैरण बियाणे सिंचनाची सोय असणाऱ्या जवळपास ८,००० पशुपालकांना १०० टक्के अनुदानावर वाटप करण्यात येणार आहे. या पूर्वनियोजनामुळे जिल्ह्यात चारा टंचाईचा प्रश्न निर्माण होणार नाही. याशिवाय, चारा साक्षरता व संवर्धन अभियानाअंतर्गत मुरघास (सायलेज) तयार करणे, निकृष्ट चाऱ्यावर युरिया प्रक्रिया करणे, हायड्रोपोनिक्स आणि अझोला निर्मितीबाबत प्रात्यक्षिकांद्वारे जनजागृती केली जात असून, जिल्ह्यात २०० कॅम्प आयोजित करण्याचा मानस आहे.

रामटेक व पारशिवनी तालुक्यात नोंदणीकृत शेतकरी संस्था किंवा बचत गटामार्फत शासकीय जमिनीवर चारा लागवड करण्याच्या नाविन्यपूर्ण प्रकल्पाची पाहणी करून १ लक्ष रुपयांच्या प्रकल्प अहवालाची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे निर्देशही देण्यात आले.

कृषी विभागाने सर्वेक्षणाचे नियोजन करावे

ठिबक सिंचन, सिंचन विहिरी, शेडनेट, ग्रीन हाऊस आणि कृषी यांत्रिकीकरण यांसारख्या 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' असलेल्या योजनांचा लाभ प्रत्येक गरजू शेतकऱ्याला मिळावा, यासाठी कृषी विभागाने गावोगावी सर्वेक्षण करून शेतकऱ्यांच्या मागणीसार १०० टक्के अर्ज महाडीबीटी पोर्टलवर 'सॅचुरेशन मोड'वर अपलोड करण्याचे, स्पष्ट निर्देश जयस्वाल यांनी बैठकीत दिले.

एनईपी तात्काळ 'रोल बॅक' करा, नागपूर विद्यापीठाच्या प्रवेशद्वारावर प्राध्यापकांचे धरणे आंदोलन

शासनाने धोरण मागे न घेतल्यास उद्यापासून साखळी उपोषण, आंदोलनाला विविध संघटनांचा पाठिंबा

नागपूरसह पाच जिल्ह्यांतील प्राध्यापकांची लक्षणीय उपस्थिती

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी २०२०) हे विद्यार्थी, प्राध्यापक व एकूणच शिक्षण व्यवस्थेचे मोठे नुकसान करणारे असून ते तात्काळ मागे (रोल बॅक) घेण्यात यावे, या मागणीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर टीचर्स ऑर्गनायझेशन (डीबाटो) द्वारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारावर जोरदार धरणे आंदोलन करण्यात आले.

आंदोलकांनी 'एनईपी रोल बॅक'च्या गगनभेदी घोषणा देत परिसर दणाणून सोडला. शासनाने व विद्यापीठाने यावर तातडीने निर्णय न घेतल्यास उद्यापासून संघटनेद्वारे साखळी उपोषण छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

या आंदोलनात डीबाटोचे अध्यक्ष सिनेट सदस्य डॉ. ओमप्रकाश चिमणकर, सचिव सिनेट सदस्य डॉ. श्रीकांत भोवते, यंग टीचर्स असोसिएशनचे संयोजक प्रमुख सिनेट सदस्य डॉ. बबनराव तायवाडे, नुटाचे सचिव सिनेट सदस्य डॉ. नितीन कोंगरे, विद्यापीठ विद्यार्थी संग्राम परिषदेचे प्रमुख सिनेट सदस्य मनमोहन बाजपेयी, प्राचार्य फोरमचे अध्यक्ष प्रा. बंडू नाईक, प्रा. अजित शृंगारपुरे, डीबाटो नागपूर शहर अध्यक्ष डॉ. विनोद राऊत, जिल्हाध्यक्ष डॉ. नितीन मेश्राम, उपाध्यक्ष डॉ. राष्ट्रपाल मेश्राम यांच्यासह नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया आणि वर्धा जिल्ह्यातील शेकडो प्राध्यापक सहभागी झाले होते.

यावेळी डॉ. बबनराव तायवाडे म्हणाले की, एनईपीमुळे प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांचे प्रचंड व्यावसायिक व शैक्षणिक नुकसान होत आहे. शासनाने व विद्यापीठाने प्रथम प्राध्यापकांचा वर्कलोड निश्चित करावा, त्यांना सेवा संरक्षण द्यावे आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी रिक्त पदांवर पूर्णवेळ नियुक्त्या कराव्यात.

डीबाटोचे सचिव डॉ. श्रीकांत भोवते यांनी शासन व विद्यापीठ प्रशासनावर सडकून टीका केली. ग्रामीण भागातील महाविद्यालयांची दुरवस्था, विनाअनुदानित व अनुदानित महाविद्यालयांमधील प्राध्यापकांची अपुरी संख्या अशा वस्तुस्थितीचा विचार न करता हे धोरण घाईघाईने लादण्यात आले आहे. आवश्यक पायाभूत सुविधा नसताना एनईपी लागू केल्याने शैक्षणिक अराजकता निर्माण झाली आहे. त्यामुळे जुनीच व्यवस्था पूर्ववत लागू करावी, अशी मागणी त्यांनी केली.

डीबाटोचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश चिमणकर यांनी स्पष्ट इशारा दिला की, या धोरणामुळे शिक्षण व्यवस्था कोलमडण्याच्या मार्गावर आहे. जर योग्य बदल झाले नाहीत, तर पुढील शैक्षणिक सत्रापासून एनईपी अंतर्गत येणाऱ्या विनामान्यता अतिरिक्त वर्गांना व विषयांना प्राध्यापक शिकवणार नाहीत. यावेळी सिनेट सदस्य डॉ. नितीन कोंगरे यांनीही एनईपी स्थगित करून पूर्वीची पद्धत लागू करण्याची मागणी केली. प्रा. डॉ. राष्ट्रपाल मेश्राम यांनी समाजकार्य व भाषा विषयाच्या प्राध्यापकांवर अतिरिक्त ठरणे आणि विद्यार्थ्यांवर शिक्षणाचा ताण येणे या वास्तव समस्यांकडे लक्ष वेधले. या आंदोलनास विविध शिक्षक संघटनांनी सक्रिय पाठिंबा दिला. येत्या काळात नागपूर विद्यापीठातील सर्व प्राध्यापक संघटनांचे सर्वसमावेशक अधिवेशन घेऊन विद्यार्थी व पालकांना सोबत घेत राज्यस्तरावर तीव्र आंदोलन उभारण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

विशेष मोहीम अंतर्गत शासकीय मुलांचे बालगृह, पाटणकर चौक, नागपूर येथे स्वच्छता मोहीम



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या विशेष मोहीम अंतर्गत दिनांक २९ ऑक्टोबर २०२६ रोजी शासकीय मुलांचे बालगृह, पाटणकर चौक, नागपूर येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान बालगृहाच्या परिसराची स्वच्छता, कार्यालयीन कक्षांची सुव्यवस्था, अनावश्यक साहित्याची योग्य विल्हेवाट तसेच उपलब्ध जागेचे सुयोग्य व्यवस्थापन यावर विशेष भर देण्यात आला. संस्थेचा परिसर स्वच्छ, नीटनेटका व आरोग्यदायी राहावा, तसेच बालगृहातील दैनंदिन कामकाज अधिक सुव्यवस्थितपणे पार पडावे, या उद्देशाने स्वच्छता व परिसर व्यवस्थापनासंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्यात आली. बालगृहातील बालकांना स्वच्छ, सुरक्षित, प्रसन्न व आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करून देणे ही संस्थेची महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे. या अनुषंगाने परिसरातील स्वच्छता राखणे, वस्तूंची योग्य मांडणी करणे, अनावश्यक साहित्य दूर करणे आणि स्वच्छतेच्या नियमांचे नियमित पालन करणे याबाबत विशेष लक्ष देण्यात आले. स्वच्छ परिसरामुळे बालकांच्या आरोग्याचे संरक्षण होण्यासोबतच त्यांच्यामध्ये स्वच्छतेच्या चांगल्या सवयी, शिस्त आणि सामाजिक जबाबदारीची भावना विकसित होण्यास मदत होते.

शासकीय कार्यालये व संस्थांमध्ये स्वच्छता, सुव्यवस्था, पर्यावरण संवर्धन आणि कार्यक्षम प्रशासकीय व्यवस्थापनाला प्रोत्साहन देणे हा विशेष मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे. त्यानुसार बालगृहातील स्वच्छता व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. स्वच्छता ही केवळ एका दिवसापुरती मर्यादित न राहता दैनंदिन कामकाजाचा अविभाज्य भाग व्हावी, या दृष्टीने अशा उपक्रमांचे विशेष महत्त्व आहे. या मोहिमेमुळे बालगृहातील स्वच्छता व सुव्यवस्था राखण्यास प्रोत्साहन मिळाले असून, बालकांसाठी अधिक सुरक्षित, स्वच्छ आणि सकारात्मक वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला. या वेळी विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास, नागपूर विभाग, अपर्णा कोल्हे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुनील मेसरे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मुस्ताक पठाण, संस्थेचे अधीक्षक देवलिंग शंभरकर तसेच संरक्षण अधिकारी श्रीमती साधना हटवार उपस्थित होते.

फटाक्यांवर पूर्ण बंदी घालण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

वृत्तसंस्था, मुंबई

दिवाळीच्या सणाच्या पार्श्वभूमीवर दिल्ली-एनसीआरमध्ये फटाक्यांवर पूर्णपणे बंदी घालण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत महत्त्वपूर्ण आणि मोठी टिप्पणी केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, न्यायालय फटाक्यांवर पूर्ण बंदी घालण्याच्या बाजूने नाही, तर याप्रकरणी एक संतुलित आदेश पारित केला जाईल.

सणांच्या काळात लोकांच्या उत्साहावर किंवा आनंदावर गदा आणण्याची न्यायालयाची मुळीच इच्छा नाही, असे स्पष्ट करत न्यायालयाने फटाक्यांचे नियम मोडणाऱ्यांवर आणि अवैध विक्री करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. टाके आणि प्रदूषणाबाबत लोकांमध्ये जागरूकता पसरवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने एक अनोखा सल्ला दिला आहे. "नवीन पिढी आधीपासूनच फटाके आणि प्रदूषणाबाबत बऱ्यापैकी जागरूक आहे. मात्र, फटाक्यांमुळे होणाऱ्या प्रदूषणाविषयी जनजागृती करण्यासाठी विराट कोहलीसारख्या लोकप्रिय सेलिब्रिटींचा वापर केला गेला पाहिजे," अशी महत्त्वपूर्ण टिप्पणी न्यायालयाने केली आहे.

नागपूर मनपानेही फोर स्टार हॉस्पिटल उभारावे, जनशक्ती मंचची मागणी

चार आरोग्य केंद्रांचे सेकंडरी हेल्थकेअर सेंटरमध्ये रूपांतर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सेलोकर यांची माहिती

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर शहरातील नागरिकांना दर्जेदार आणि अत्याधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नागपूर महानगरपालिकेनेही पुणे, ठाणे, पिंपरी- चिंचवड आणि नाशिक महानगरपालिकांचा धर्तीवर फोर स्टार हॉस्पिटल उभारावे, अशी मागणी जनशक्ती मंचच्या शिष्टमंडळाने केली. वासंदभात शिष्टमंडळाने नागपूर महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सेलोकर यांची त्यांच्या दालनात भेट घेऊन चर्चा केली.

या चर्चेदरम्यान डॉ. सेलोकर यांनी सांगितले की, नागपूर



महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील सुमारे चार वैद्यकीय व क्लिनिकल केंद्रांचे सेकंडरी हेल्थकेअर सेंटरमध्ये श्रेणीवर्धन करण्याची प्रक्रिया प्रस्तावित आहे. यामध्ये स्वर्गीय प्रभाकररावजी मेमोरियल क्लिनिकल सेंटर येथे आवश्यक वैद्यकीय उपकरणांनी सुसज्ज असे निदान केंद्र (डायग्नोस्टिक सेंटर) विकसित करण्यात येणार आहे. तसेच इमामबाडा आयसोलेशन हॉस्पिटलला सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) प्रकल्पांतर्गत सेकंडरी हेल्थकेअर सेंटर म्हणून विकसित करण्याचा प्रस्ताव आहे. याशिवाय, मिनीमाता नगर वेथील प्राथमिक आरोग्य केंद्र आणि इंदोरा आरोग्य केंद्र यांचे अनुक्रमे ३० आणि ६० खाटांच्या क्षमतेच्या द्वितीयक स्तरावरील रुग्णालयांमध्ये रूपांतर करण्याचे प्रस्तावित असल्याची माहितीही डॉ. सेलोकर यांनी दिली.

नागपूरकरांना दर्जेदार आरोग्य सुविधांची अपेक्षा

नागपूर हे विदर्भातील प्रमुख शहर असून, येथे मोठ्या संख्येने नागरिक उपचारांसाठी येतात. वाढती लोकसंख्या आणि आरोग्य सेवांवरील वाढता ताण लक्षात घेता महानगरपालिकेने अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांनी सुसज्ज रुग्णालय उभारण्याची गरज असल्याचे जनशक्ती मंचच्या शिष्टमंडळाने मांडले. पुणे, ठाणे, पिंपरी- चिंचवड आणि नाशिक महानगरपालिकांनी आपल्या शहरांमध्ये फोर स्टार हॉस्पिटल उभारण्याच्या दिशेने केलेल्या प्रयत्नांप्रमाणे नागपूर महानगरपालिकेनेही पुढाकार घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

या शिष्टमंडळात माजी आमदार दीनानाथ पडोळे, मुन्ना महाजन, सिध्दु कोमजवार,सतीश यादव, पंकज कालबांडे, नितीन नावडू, जंगबहादूर यादव, शरद भस्मे, किशोर कमलाकर, चांगदेव शेंद्रे यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा समावेश होता. नागपूर शहरातील आरोग्य सुविधांचा विस्तार, आधुनिक वैद्यकीय उपकरणांची उपलब्धता आणि नागरिकांना परवडणाऱ्या दरात दर्जेदार उपचार मिळावेत, या उद्देशाने जनशक्ती मंचने महानगरपालिकेकडे फोर स्टार हॉस्पिटल उभारण्याची मागणी केली आहे.

थोडक्यात

नागपूर पदवीधर मतदारसंघात अभिजीत वंजारींचा विजय

३,२७१ मतांनी कोहळेंना मात, बल्लारपूरमध्ये महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांचा जल्लोष



दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर- धनंजय पांढरे

नागपूर विभाग विधान परिषद पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत अखेर काँग्रेसचे अभिजीत वंजारी यांनी विजय मिळविला आहे. तब्बल ४१ तासांहून अधिक काळ चाललेल्या अटीतटीच्या मतमोजणीनंतर वंजारी यांच्या विजयावर शिक्कामोर्तब झाले. त्यांना प्रथम व द्वितीय पसंतीक्रमाची मिळून एकूण ६७ हजार २३१ मते मिळाली, तर भाजपचे प्रतिस्पर्धी उमेदवार सुधाकर कोहळे यांना ६३ हजार ९६० मते मिळाली. अशा प्रकारे वंजारी यांनी कोहळे यांच्यावर ३ हजार २७१ मतांची आघाडी घेत विजय संपादन केला. गुरुवारी दुपारी १२ वाजता नगर परिषद चौकात महाविकास आघाडी,विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ व इतर संघटना तर्फे छत्रपती शिवाजी महाराज व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या ला अभिवादन करण्यात आला.नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी ढोल वाजवून, फटाके फोडून आणि मिठाई वाटून हा उत्सव साजरा केला.

या प्रसंगी नगराध्यक्षा डॉ. अल्का अनिल वाढइ, उपाध्यक्ष देवेंद्र आर्य, पूर्व नगराध्यक्ष घनश्याम मूलचंदानी, छाया मडावी, तालुका काग्रेस अध्यक्ष गोविंदा उपरे, डॉ. अनिल वाढइ, सीनेट सदस्य दीपक धोपटे, नगरसेवक भास्कर माकोडे, करुणा रेब्बावार, शिल्पा चुटे, मोना धानोरकर, अंकुबाई भुक्या, मनोज बेले, अफसाना सैय्यद, इंदु राजुरकर, सपना मोरे, प्रियंका नाईक, सुवर्ण मुरकुटे, ज्योति गहलोद, प्रा.बल्कि, प्रा. अनिल वाग्दरकर, प्रकाश पाठक, प्रा. युवराज बोबडे, किसन पोड़े, मनोहर मालेकर श्रीधर फटाले चेतन गेडाम नरेश आनंद गणपत इटणकर डेविड कम्पेल्ली फहीम शेख बाबू राशिद फारुख शेख रवी बेले अनिल खरतड आर आर यादव युसूफ शेख संजय झिल्लेवर सुधाकर पोपळे प्रभाकर मुरकुटे महमूद पठाण सादिक शेख अस्लम शेख नाना बुंदेल अजय जुमडे दिलीप मकोडे सुधीर अमराज प्राणेश अमराज नितीन तेलंग सह महाविकास आघाडी चे नेते व कार्यकर्ते उपस्थित होते.

कच्च्या तेलात मोठी घसरण!

मुंबई : अमेरिका आणि इराण यांच्यात पुन्हा एकदा राजनैतिक चर्चा सुरू होण्याची शक्यता निर्माण झाल्याने आंतरराष्ट्रीय बाजारात कच्चा तेलाच्या किमतीत गुरुवार दि. २९ ऑक्टोबर रोजी घसरण झाली. अमेरिका-इराणमधील शांतता प्रयत्नांमुळे पुरवठा खंडित होण्याचा धोका टळू शकतो, या आशेने बाजारात दिलासा मिळाला आहे. मात्र, दुसरीकडे मध्य पूर्वेतील वाढता लष्करी तणाव आणि हुथी बंडखोरांचे सुरू असलेले हल्ले यांमुळे तेलाच्या किमतीतील ही घसरण मर्यादित राहिल्याचे पाहायला मिळाले. गुरुवारी आंतरराष्ट्रीय बाजारात ब्रेंट क्रूडचे दर ०.८५ डॉलरने (०.७४ टक्के) घसरून ११४.५० डॉलर प्रति बॅरलवर आले. तर अमेरिकेच्या वेस्ट टेक्सास इंटरमीडिएट तेलाचे दर ०.९१ डॉलरने (०.८९ टक्के) घसरून १०१.९० डॉलर प्रति बॅरलवर नोंदवले गेले. आदल्या सत्रात झालेल्या दरवाढीनंतर ही घट पाहायला मिळाली आहे. अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स यांनी इराणच्या सुरक्षा परिषदेचे प्रमुख मोहसेन रझाई यांना शांतता चर्चा पुन्हा सुरू करण्यासाठी पत्र लिहिल्याचे वृत्त दिले आहे. या संभाव्य चर्चेच्या बातम्यांमुळे तेल बाजारातील चिंता काहीशी कमी झाली आहे. मात्र, ३ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या अमेरिकेतील मध्यावधी निवडणुकांनंतर इराणवर लष्करी कारवाई होण्याची शक्यता आणि येमेनमधील हुथी बंडखोरांचे सलग हल्ले यांमुळे तेल पुरवठ्याबाबतची अनिश्चितता कायम आहे.

सौदी अरेबियाच्या पूर्व भागाच्या दिशेने हुथी बंडखोरांनी डागलेले क्षेपणास्त्र गुरुवारी सौदीप्रणीत आघाडीच्या सैन्याने हवेतच नष्ट केले. याआधी बंडखोरांनी अदेन विमानतळावर हल्ला केला होता, तसेच सौदीच्या रोज ५ लाख ५० हजार बॅरल क्षमता असलेल्या मोठ्या तेल शुद्धीकरण प्रकल्पावर क्षेपणास्त्र हल्ला केल्याचा दावाही हुथींनी केला आहे. या सातत्याने होणाऱ्या हल्ल्यांमुळे जगात दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे तेल उत्पादक असलेल्या सौदी अरेबियातील पुरवठा साखळी विस्कळीत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अमेरिकेच्या एनर्जी इन्फॉर्मेशन ॲडमिनिस्ट्रेशनने जारी केलेल्या आकडेवारीनुसार, गेल्या आठवड्यात अमेरिकेतील कच्चा तेलाच्या साठ्यात १९ लाख बॅरलची घट झाली आहे. मात्र, दुसरीकडे पेट्रोलचा साठा ३९ लाख बॅरलने वाढला आहे. एकीकडे जागतिक राजकारणातील घडामोडी आणि दुसरीकडे मागणी-पुरवठ्याचे बदलणारे गणित, यामुळे आगामी दिवसांत कच्चा तेलाचे दर कोणत्या दिशेने जातात, याकडे जगभरातील बाजारपेठांचे लक्ष लागले आहे.

भारत उतरणार कंटेनरनिर्मितीत

नवी दिल्ली : जगात कंटेनरची वाढती मागणी लक्षात घेता केंद्र सरकारने देशांतर्गत उत्पादनाला चालना देण्यासाठी आणि आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी रणनीती आखली आहे. यांतर्गत कंटेनरनिर्मिती प्रोत्साहन योजनेवर १०,००० कोटी रुपये खर्च केले जातील. या क्षेत्रातील चीनच्या वर्चस्वाला आव्हान देणे आणि भारताला कंटेनरनिर्मितीचे प्रमुख केंद्र बनवणे हे सरकारचे उद्दिष्ट आहे. यासोबतच केंद्रीय मंत्रिमंडळाने क्रीडा साहित्य उद्योगाला चालना देण्यासाठी १,८५६.६७ कोटी रुपयांच्या योजनेलाही मंजुरी दिली आहे. या दोन्ही योजनांमुळे देशांतर्गत उत्पादन, गुंतवणूक आणि रोजगाराला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या या निर्णयांची माहिती केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. भारतातील कंटेनरच्या मागणीचा मोठा भाग आयातीद्वारे पूर्ण केला जातो. चीन या क्षेत्रातील प्रमुख पुरवठादार आहे. जागतिक संकटांच्या काळात कंटेनरच्या किमती आणि भाड्यातील चढ-उतारामुळे व्यापाऱ्यांचा खर्च वाढतो. देशांतर्गत उत्पादन वाढल्याने हे अवलंबित्व कमी होण्यास मदत होईल.

फडणवीस, ठाकरे बंधूंमध्ये गुप्तगू



वृत्तसंस्था, मुंबई

मुख्यमंत्री देवेंद्र फडवीस आणि ठाकरे बंधू राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे आज एकाच मंचावर आले. महाराष्ट्राच्या हास्यरेषा या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यानिमित्त या नेत्यांची विशेष उपस्थिती लाभली. विविध निवडणुकांनंतर आता प्रथमच हे तीन नेते एकत्र आल्याने ते काय बोलणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. यावेळी नेत्यांनी मिश्किल टोलेबाजी करीत कार्यक्रमात रंगत आणली. तत्पूर्वी मुख्यमंत्री फडणवीस आणि ठाकरे बंधूंमध्ये बंदद्वाराआड गुप्तगू झाल्याने चर्चेला उधाण आले आहे.

ज्येष्ठ व्यंगचित्रकार प्रशांत कुलकर्णी संपादित महाराष्ट्राच्या हास्यरेषा या मराठी व्यंगचित्रकलेचा १०० वर्षांचा प्रवास उलगडणाऱ्या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यानिमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे तिन्ही दिग्गज नेते एकाच व्यासपीठावर एकत्र आले. ग्रंथाली प्रकाशनाच्या वतीने आयोजित हा प्रकाशन सोहळा दादर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारक सभागृहात पार पडला.या सार्वजनिक कार्यक्रमाच्या औपचारिक सुरुवातीपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यात बंद दाराआड चर्चा पार पडली. राज्यातील सध्याच्या राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर या तिन्ही प्रमुख नेत्यांमध्ये बंद दाराआड नेमकी काय चर्चा झाली, याबाबत राजकीय वर्तुळात उलट-सुलट चर्चांना उधाण आले आहे.

या तिन्ही नेत्यांच्या बंद दाराआड झालेल्या चर्चेला विशेष राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. रायगड जिल्ह्यातील कर्जत येथील टोरेंट पॉवर प्रकल्पाच्या मुद्द्यावरून मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी नुकतीच राज्य सरकारवर जोरदार टीका केली होती. त्याचसोबत ठाण्यातील प्रदीप पूर्णेकर प्रकरणात उद्धव ठाकरे यांची शिवसेना अत्यंत आक्रमक झाली आहे. तसेच विधान परिषद निवडणुकीत महाविकास आघाडीने तीन जागांवर तर महायुतीने दोन विजय मिळवला. यावरून महायुतीत शिवसेना आणि भाजपमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी सुरू असतानाच हे गुप्तगू झाल्याने या चर्चेला विशेष महत्त्व आहे.

दोन्ही ठाकरे बंधूंनी मला काम करू द्यावे

या कार्यक्रमात टोलेबाजीने रंगत आणली. सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी राज ठाकरे बोलावले तर मुख्यमंत्री येतात, असा उल्लेख केला. त्यावर राज ठाकरे यांनी याच्यापुढे मी बोलवत जाईन आणि ते येत जातील. पण २०२९ पर्यंत मुख्यमंत्र्यांना ठेवा म्हणजे झाले, असा शेलार यांना मिश्किल टोला लगावला. त्यावर मुख्यमंत्र्यांनी मी राजकारणात काम करायला तयार आहे. परंतु दोन्ही ठाकरे बंधूंनी मला काम करू द्यावे, असा टोला लगावत कार्यक्रमात चांगलीच रंगत आणली.

नीट पेपरफुट; आरोप निश्चितीचा आदेश रोखला

नवी दिल्ली : वैद्यकीय प्रवेश परीक्षा (नीट यूजी) पेपर लीक प्रकरणातील आरोप निश्चित करण्याबाबतचा आदेश राऊस अव्हेन्यू न्यायालयाने गुरूवार दि. २९ ऑक्टोबर रोजी राखून ठेवला. केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) या प्रकरणात १४ जणांना आरोपी केले आहे. न्यायालय यावर १८ नोव्हेंबर रोजी आपला आदेश सुनावणार आहे. नीट यूजी पेपर लीक प्रकरणाचा तपास करण्यासाठी सीबीआय ने मे महिन्यात गुन्हा नोंदवला होता. या प्रकरणी सीबीआयने जुलै महिन्यात १३ आरोपींविरुद्ध आरोपपत्र दाखल केले होते. त्यानंतर १४ व्या आरोपी, शेषराव बजरंग सूर्यवंशी याच्याविरुद्ध पुरवणी आरोपपत्र दाखल करण्यात आले होते. न्यायालयाने ऑगस्ट महिन्यात मुख्य आरोपपत्राची दखल घेतली होती. सीबीआयचे विशेष न्यायाधीश अजय गुप्ता यांनी सीबीआय आणि आरोपी शेषराव बजरंग सूर्यवंशी यांच्या वकिलांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, आरोप निश्चित करण्याबाबतचा आदेश राखून ठेवला.

२ सप्टेंबर रोजी सूर्यवंशीच्या अटकेनंतर त्याच्याविरुद्ध पुरवणी आरोपपत्र दाखल करण्यात आले होते. सीबीआयच्या वतीने वरिष्ठ सरकारी वकील व्ही. के. पाठक यांनी बाजू मांडली. सीबीआयने मुख्य आरोपपत्रात ज्या इतर १३ आरोपींची नावे दिली आहेत, त्यांच्या संदर्भातील युक्तिवाद न्यायालयाने यापूर्वीच ऐकून घेतले आहेत. या प्रकरणातील इतर १३ आरोपींमध्ये मनीषा मंधारे, मनीषा संजय हवालदार, मनीषा वाघमारे, प्रल्हाद कुलकर्णी, शिवराज रघुनाथ मोटेगावकर, डॉ. मनोज शिरुरे, तेजस हर्षद शहा यांच्यासह इतरांचा समावेश आहे.

कांदा ८० रुपये किलो

मुंबई : दिवाळीपूर्वीच कांद्याचे दर प्रतिकिलो ८० रुपयांवर पोहोचले आहेत. घाऊक बाजारातील दरवाढ आणि जुन्या कांद्याचा कमी झालेला साठा यामुळे आगामी दीड महिन्यात दिलासा मिळण्याची शक्यता कमी आहे. दुसरीकडे, लसूण ४०० रुपये आणि आले १०० रुपये किलोपर्यंत पोहोचल्याने सर्वसामान्यांचे बजेट कोलमडले आहे. दिवाळीचा सण जवळ येत असतानाच महागाईने सर्वसामान्यांच्या खिशाला मोठा फटका दिला आहे. रोजच्या जेवणात वापरल्या जाणाऱ्या कांद्याचे दर अचानक वाढल्याने ग्राहकांचे आर्थिक गणित बिघडले आहे. किरकोळ बाजारात चांगल्या दर्जाचा कांदा प्रतिकिलो ८० रुपयांपर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे दिवाळीच्या खरेदीसोबतच रोजच्या स्वयंपाकाचा खर्चही वाढला आहे. कांद्याच्या वाढत्या दरांमुळे गृहिणींचे बजेट कोलमडले असून, सणासुदीच्या काळात ग्राहकांना महागाईचा सामना करावा लागत आहे. व्यापा-यांच्या अंदाजानुसार, आगामी दीड महिन्यापर्यंत कांद्याच्या दरात मोठी घट होण्याची शक्यता कमी आहे. गेल्या काही दिवसांपासून कांद्याच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. बाजार समित्यांमध्ये कांद्याचे घाऊक दर प्रतिकिलो ५५ ते ६५ रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. त्यात वाहतूक खर्च आणि कमिशनपोटी अतिरिक्त पाच टक्के शुल्क द्यावे लागत असल्याने विक्रेत्यांचा खरेदी खर्च आणखी वाढत आहे.

परिणामी, किरकोळ विक्रेत्यांना घाऊक बाजारातून कांदा ६५ ते ७० रुपये किलो दराने खरेदी करावा लागत आहे. त्यानंतर किरकोळ बाजारात चांगल्या दर्जाचा कांदा ८० रुपये किलोने विकला जात आहे. आधीच महागाईचा सामना करणा-या ग्राहकांना या दरवाढीमुळे मोठा आर्थिक फटका बसत आहे.

कांद्याच्या दरवाढीमागे मागणी आणि पुरवठ्यातील तफावत हे प्रमुख कारण असल्याचे व्यापा-यांचे म्हणणे आहे. जुन्या कांद्याचा साठा जवळपास संपुष्टात आला असून, नवीन पीक मोठ्या प्रमाणात बाजारात येण्यासाठी आणखी काही काळ प्रतीक्षा करावी लागणार आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर कांद्याची मागणी वाढत असताना पुरवठा मर्यादित असल्याने दर चढेच आहेत. दलालांकडूनही आगामी किमान दीड महिनाभर कांद्याच्या दरात घसरण होण्याची शक्यता नसल्याचे विक्रेत्यांना सांगण्यात येत आहे. त्यामुळे ग्राहकांना आणखी काही काळ महाग कांदा खरेदी करावा लागण्याची शक्यता आहे. कांद्याबरोबरच लसूण आणि आल्याच्या दरांनीही ग्राहकांना हैराण केले आहे. घाऊक बाजारात लसणाचे दर प्रतिकिलो २५० ते ३०० रुपये आहेत, तर किरकोळ बाजारात लसूण ३२० ते ४०० रुपये किलोने विकला जात आहे.

कार घेण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी दोन कारची चाके चोरली : रामनगर पोलिसांनी विधिसंघर्षग्रस्त बालकाला घेतले ताब्यात

दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर-धनंजय पांढरे

स्वतःची कार घेण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या दोन कारची चार-चार चाके अल्लॉयव्हीलसह चोरण्याचा धक्कादायक प्रकार चंद्रपूरमध्ये उघडकीस आला आहे. कार खरेदीसाठी कमी पडणारे पैसे गोळा करण्याच्या उद्देशाने हवेली गार्डन परिसरातील एका विधिसंघर्षग्रस्त बालकाने ही चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाले. रामनगर पोलिसांनी त्याला पालकांसमक्ष ताब्यात घेत दोन्ही गुन्ह्यांची उकल केली असून, एकूण १ लाख ७० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

२१ ऑक्टोबरच्या रात्री ८ वाजेपासून २२ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजेपर्यंत नागपूर रोडवरील गॅरेजसमोर पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या भूषण नारायणराव गवांडे यांच्या मारुती सुझुकी ब्रेझा कारचे चारही टायर अल्लॉयव्हीलसह काढून नेण्यात आले.

याप्रकरणी रामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १२३१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ (२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

याच परिसरातील कुंदन प्लाझा चौकातील ए. वन कार वॉशिंग सेंटरसमोर उभ्या असलेल्या बलेनो कारचेही चारही टायर अल्लॉयव्हीलसह चोरीला गेले होते. याप्रकरणी गुन्हा क्रमांक १२३२/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. एकाच परिसरात दोन कारची चाके चोरीला गेल्याने पोलिससांमोर चोरट्याचा शोध घेण्याचे आव्हान होते.

रामनगर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक प्रभावती एकुरके यांनी शोध पथकाला तपासाच्या सूचना दिल्या. पोलिसांनी कसून शोध घेतला असता, कार घेण्यासाठी कमी पडणारी रक्कम जमविण्याच्या उद्देशाने संबंधित बालकाने दोन्ही कारची चाके चोरून विकण्याचा प्रयत्न केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांनी त्याला त्याच्या पालकांसमक्ष ताब्यात घेतले.

या कारवाईत चोरीची आठ टायर अलॉयव्हीलसह, गुन्ह्यात वापरलेली मोपेड दुचाकी आणि चारचाकी वाहनाचा जॅक असा एकूण १ लाख ७० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे रामनगर पोलिसांनी दोन गुन्ह्यांची उकल केली आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रभावती एकुरके, सहायक पोलीस निरीक्षक शिवाजी नागरे, सहायक पोलीस निरीक्षक हनुमान उगले, पोलीस उपनिरीक्षक कृष्णा दराडे तसेच पोलीस अंमलदार आनंद खरात, प्रकाश बलकी, मंगेश शेंडे, रामप्रसाद नैताम, बाबा नैताम, रविकुमार डेंगळे, जितेंद्र आकरे, मनिषा मोरे, पंकज ठोंबरे, प्रकाश मडावी, संदीप गेडाम, सुरेश कोरवार, पंकज पोदे, सूरज शेडमाके आणि ब्ल्यूटी साखरे यांनी केली.

संगीतसाधक बिश्वनाथ चॅटर्जी यांचा हृद्य सत्कार

वि. सा. संघ आणि राष्ट्रभाषा परिवारातर्फे अनोखा कार्यक्रम



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

भारतीय हिंदी चित्रपटगीतांच्या माहितीचे संकलन आणि जतन करण्यासाठी आयुष्य वेचणारे नागपूरचे या संगीतसाधक बिश्वनाथ चॅटर्जी यांचा विदर्भ साहित्य संघ आणि राष्ट्रभाषा परिवार यांच्यावतीने गुरुवारी हृद्य सत्कार करण्यात आला.

कॅलिग्राफी केलेली शाल, ग्रामोफोनच्या तबकडीपासून तयार केलेले स्मृतिचिन्ह आणि गीतकार-संगीतकारांच्या मांदियाळीने सजलेले सुरेख मानपत्र आणि माधुरी व स्टारडस्ट मासिकांच्या कागदापासून तयार केलेला हार देऊन अतिशय अनोख्या पद्धतीने चॅटर्जी यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. ना तुम हमे जानो या गीतावर अमर शेंडे यांनी वाजवलेल्या व्हायोलिनच्या स्वरांच्या पार्श्वभूमीवर भाग्यश्री बारस्कर यांनी केलेले मानपत्राचे वाचन विशेष लक्षवेधक ठरले. गायक, वादक, नाट्य कलावंतांद्वारे त्यांनी अशी अनोखी मानवंदना देण्यात आली.

श्रीमंत बाबूराव धनवटे सभागृहात पार पडलेल्या या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. वि. स. जोग होते तर विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी आणि राष्ट्रभाषा परिवाराचे सचिव सुरेशबाबू अग्रवाल प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डॉ. गांधी यांनी आपल्या मनोगतात ध्येयवादाने प्रेरित होऊन प्रसिद्धी आणि मानसन्मानाची अपेक्षा न ठेवता काम करणाऱ्या ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वाचा हा गौरव असल्याचे सांगितले. हा केवळ सत्कार नसून कृतज्ञता व्यक्त करण्याचा सोहळा असल्याची भावनाही त्यांनी मांडली.

सुरेशबाबू अग्रवाल म्हणाले, देशभरातील अनेक नामवंत गीतकार आणि संगीत क्षेत्रातील दिग्गज चॅटर्जी यांना मार्गदर्शक मानतात. त्यांचे ज्ञान आणि मार्गदर्शन नव्या संगीतकारांसाठी प्रेरणादायी आहे.

अध्यक्षीय भाषणात डॉ. जोग यांनी चॅटर्जी यांचा गौरव हा जणू त्यांना डी. लिट प्रदान सोहळ्याच असल्याचे मत व्यक्त केले. अजेय गंपावार यांनी प्रास्ताविकातून चॅटर्जी यांच्या सत्कारामागची भूमिका विशद केली. वैदेही चवरे यांनी सूत्रसंचालन केले, तर बाळ कुळकर्णी यांनी आभार मानले. या सोहळ्याला अरुणा सबाने, विलास मानेकर, माधुरी साकुळकर, शुभदा फडणवीस यांच्यासह कलाक्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामोफोन का पुराना रिकॉर्ड

कार्यक्रमाच्या सुरुवातीला ग्रामोफोन का पुराना रिकॉर्ड या संगीतविषयक सादरीकरणातून ग्रामोफोनच्या काळापासूनचा संगीताचा इतिहास उलगडण्यात आला. अयोध्येचे राजे, कवी, लेखक संगीततज्ज्ञ यतींद्र मिश्र यांची कविता ग्रामोफोन की पुरानी रिकार्डवर आधारित या सादरीकरणाने कार्यक्रमाला एक वेगळी उंची लाभली. नाट्य दिग्दर्शक रुपेश पवार आणि मंगल सानप यांनी हे सादरीकरण केले.

अचूक माहिती पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवायची आहे : बिश्वनाथ चॅटर्जी

सत्काराला उत्तर देताना बिश्वनाथ चॅटर्जी म्हणाले, हिंदी चित्रपट संगीताचा इतिहास, त्यातील गाणी, गायक, संगीतकार, गीतकार आणि वादक यांच्या योगदानाची अचूक नोंद जतन करून ती पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे, हा हिंदी चित्रपट गीतकोशाच्या निर्मितीमागील मुख्य उद्देश आहे.

आर. डी. बर्मन, गुलजार, वसंत देसाई आणि मदन मोहन यांच्याशी संबंधित संगीतविषयक पुस्तकांच्या निर्मितीचा उल्लेख करत त्यांनी विविध भाषांतील चित्रपट संगीताचाही अभ्यास केल्याचे सांगितले. या कार्यात अनेकांचे योगदान असल्याने त्याचे श्रेय सर्वांना मिळणे आवश्यक आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी पत्नी रीता आणि दोन मोठ्या भावांच्या आठवणींना उजाळा देताना ते भावुक झाले. मी हे काम कधीही वादक यांच्या योगदानाची मानसन्मानासाठी केले नाही. तो माझा स्वानंद होता. पण आयुष्यातील पहिलाच सन्मान स्वीकारताना मनस्वी आनंद होत आहे, अशा शब्दांत ज्येष्ठ चित्रपट संगीत अभ्यासक बिश्वनाथ चॅटर्जी यांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली.